# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२०

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक १२ मार्च, २०२० / फाल्गुन २२, १९४१ (शके)**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **गृह मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **महसूल मंत्री** | |
| **(३)** | **पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, क्रीडा व युवक कल्याण मंत्री** | |
| **(४)** | **कृषी, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री** | |
| **(५)** | **रोजगार हमी, फलोत्पादन मंत्री** | |
| **(६)** | **वस्त्रोद्योग, मत्स्यव्यवसाय, बंदरे मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४६**

---

### मुंबई शहर व उपनगरातील कोळीवाड्यांचे सिमांकन करण्याबाबत

**(१) * १०१ श्री.विलास पोतनीस, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.नागोराव गाणार : तारांकित प्रश्न क्रमांक ४१३७९ ला दिनांक १३ जुलै, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगरविकास विभागाच्या यादीत असलेल्या कोळीवाड्यांचे सिमांकन करुन ते मुंबई महानगरपालिकेकडे पाठविण्यात यावेत, मत्स्यव्यवसाय विकास विभागाच्या यादीत असलेल्या १५ कोळीवाड्यांचे सर्वेक्षण करून त्यांचे सिमांकन करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात यावी, तसेच मुंबई विकास आराखड्यात कोळीवाड्यांचा समावेश करुन सिमांकन व्हावे इ. मागण्यांसाठी कोळी समाजाच्या संघटनांनी तसेच लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने ठरविलेल्या निकषांनुसार सर्वेक्षण करण्याची प्रक्रिया सुरु

करण्याचे निर्देश दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ रोजी तत्कालीन महसूल मंत्री यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात येवूनही मुंबई शहर व उपनगरातील कोळीवाड्यांचे सिमांकन झाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई शहर व मुंबई उपनगरातील सर्व कोळीवाड्यांचे संयुक्त सिमांकन मोजणी करण्यासाठी शासनाने सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय विभाग, मुंबई यांचेकडील प्रतिनिधी व या कार्यालयाचे परिरक्षण भूमापक यांचे मोजणी पथक माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान तयार करण्यात आले असून मोजणी पथकाने किती व कोणत्या कोळीवाड्यांची संयुक्त सिमांकन मोजणी केली आहे तसेच किती व कोणत्या कोळीवाड्यांची सिमांकन मोजणी करणे प्रलंबित आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबई शहर व उपनगरातील कोळीवाड्यांचे सिमांकन व सर्वेक्षण करण्याच्या कामाकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करून मुंबई शहर व उपनगरातील कोळीवाड्यांच्या सिमांकन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१), (२), (३) व (४) मस्त्यव्यवसाय विभागाच्या माहितीनुसार मुंबई शहर जिल्ह्यात १२ तर मुंबई उपनगर जिल्ह्यात २९ असे एकूण ४१ कोळीवाडे आहेत. सदर कोळीवाड्यांच्या सिमांकनाबाबतची कार्यपध्दती व मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यासाठी दिनांक २०/११/२०१२ च्या शासन निर्णयान्वये एक समिती गठीत करण्यात आली होती.

त्यानुषंगाने, उपसंचालक, भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई यांनी दिनांक ०१/०१/२०१८ च्या पत्रान्वये प्रत्यक्ष कोळीवाड्यांचा स्थळ पाहणी करून शासनास सादर केलेला अहवाल स्वीकारण्यास शासनाने मान्यता दिली. सदर मान्यतेनुसार मुंबईतील कोळीवाड्यांचे प्रत्यक्ष सर्वेक्षण करुन सिमांकन करण्याचे शासनाने निश्चित केले आहे.

त्यानुसार उपसंचालक, भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई यांनी दिनांक २४/१२/२०१८ व १२/०२/२०१९ च्या पत्रान्वये मुंबई उपनगरामधील गव्हाणपाडा वगळून १३ कोळीवाड्यांचे सर्वेक्षण व सिमांकनाबाबतची कार्यवाही पूर्ण करून शासनास अहवाल सादर केला.

त्यानंतर मा.मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २१/०२/२०१९ रोजी झालेल्या बैठकीमध्ये उर्वरित कोळीवाड्यांचे सिमांकन करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. त्यानुसार ६ कोळीवाड्यांमधील स्थानिक रहिवाश्यांनी विरोध केल्याने सिमांकन मोजणी करता आली नाही. परंतु, जुहू मांगेला, बंदरपाखाडी, एकसर, कांदिवलीगांव, गोवंडी, देवनार, विक्रोळी, भांडूपगांव/नाहूर व मुलुंड गव्हाणपाडा/नवघर या ९ कोळीवाड्यांचे मस्त्यव्यवसाय विभागाचे प्रतिनिधींनी दाखविलेल्या सिमांकनाबाबत संबंधित कोळीवाड्यांचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत बाहेरील हद्दीच्या मोजणीची कार्यवाही पूर्ण करून, उपसंचालक, भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई यांनी दिनांक ११/१२/२०१९ रोजी अहवाल शासनास सादर केला आहे.

तसेच मुंबई शहर जिल्हयाबाबत शासनास सादर केलेल्या अहवालामध्ये मुंबई शहर जिल्हयात ७ ठिकाणी कोळीवाडे असल्याचे नमूद केले आहे. या ७ कोळीवाड्यांच्या बाहेरील हद्दीची मोजणी करून उपसंचालक, भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई यांनी दिनांक २९/०१/२०१९ रोजी मोजणी नकाशासह अहवाल सादर केला आहे.

मुंबई शहर जिल्हयातील कोळीवाड्यांच्या सिमांकनामधील मिळकती या बृहन्मुंबई महानगरपालिका, म्हाडा, मुंबई पोर्ट ट्रस्ट इत्यादी प्राधिकरणांच्या मालकी व खाजगी मालकीचे असल्याचे दिसून आले आहे. परंतु सिमांकन करताना वरील प्राधिकरणांना जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, मुंबई शहर यांनी कोणत्याही प्रकारची नोटीस दिलेली नाही अथवा त्यांचे म्हणणे घेतलेले नाही. ही बाब विचारात घेऊन नैसर्गिक न्याय तत्वाचे पालन होण्याच्यादृष्टीने मुंबई शहर जिल्हयातील कोळीवाड्यांचे सिमांकन अंतिम करण्यापूर्वी जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्या कार्यालयाकडून नमूद सर्व प्राधिकरणांना त्यांची जमीन कोळीवाड्यांच्या प्रस्तावित सिमांकनात येत असल्याविषयी त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात येऊन, त्यांचे अभिमत नोंदवून घेऊन स्वयंस्पष्ट अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर तद्नुसार शासनास सविस्तर अहवाल सादर करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांना दिनांक २२/०२/२०१९ रोजी देण्यात आल्या आहेत.

याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्याकडून कार्यवाही सुरू आहे. तसेच मुंबई शहर जिल्ह्यातील अन्य कोळीवाड्यांची मोजणी करणेबाबत स्थळ पाहणीव्दारे खात्री करून अहवाल सादर करण्यास उपसंचालक, भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई यांना कळविण्यात आले आहे.

-----------------

## वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील रिक्त पदे भरण्याबाबत

**(२) * १२४२ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील गट अ, ब, क आणि ड ची दिनांक ३०/०९/२०१९ अखेर सरळसेवा व पदोन्नती श्रेणीतील २८८४ मंजूर पदांपैकी १६२७ पदे भरलेली असून १२५७ पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रिक्त पदांमुळे प्रशासकीय कामे विलंबाने होत असून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामासंदर्भात गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी अंतर्गत १२ घटक महाविद्यालये आहेत. महाविद्यालयातील रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार प्राध्यापकांकडे देण्यात आलेला आहे. मागील काही वर्षापासून विनाअनुदानित खाजगी महाविद्यालयांची संख्या वाढल्यामुळे विद्यापीठातील शैक्षणिक कामावर ताण येत आहे. वित्त विभाग, शासन निर्णय,

दिनांक ०२/०६/२०१५ रोजीच्या निर्णयानुसार सरळसेवेच्या रिक्त असणाऱ्या पदांपैकी ५०% किंवा एकूण मंजूर संवर्गाच्या ४% यापैकी जे कमी असेल इतकीच पदे भरता येतील असे निर्देश आहेत.

महाराष्ट्र कृषी विद्यापीठे अधिनियम १९८३ च्या कलम ५८(१) अन्वये राज्यातील कृषी विद्यापीठांमधील प्राध्यापक व त्यावरील संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही महाराष्ट्र कृषी विद्यापीठ सेवा प्रवेश मंडळ, कृषी परिषद, पुणे यांच्यास्तरावरुन होते. त्यानुसार सरळसेवेची रिक्त पदे भरण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक ३०/१/२०२० अन्वये कृषी परिषदेस सादर केला आहे.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील वरिष्ठ संशोधन सहायक, प्रयोग शाळा सहायक, वरिष्ठ लिपिक, लघुटंकलेखक या पदांच्या भरतीबाबतची प्रक्रिया चालू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे तिसगाव (ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद) येथील शासकीय गायरान जमिनींवर अवैधरित्या उत्खनन होत असल्याबाबत

**(३) * ११९६ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे तिसगाव (ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद) येथील शासकीय गायरान तसेच मागासवर्गीयांना वाटप केलेल्या गायरान जमिनींवर कोणतीही परवानगी न घेता गेल्या २५ ते ३० वर्षापासून अवैधरित्या ब्लास्टिंग करुन क्रशरने खडी उत्खनन करण्यात येत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवैधरित्या डोंगर फोडून उत्खनन करुन शासनाचा कोट्यवधी रुपयांच्या महसूल बुडविल्याप्रकरणी स्थानिकांनी मा.मुख्यमंत्री, जिल्हाधिकारी, अप्पर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक २७ मे, २०१९ रोजी लेखी निवेदनाद्वारे तक्रारी दाखल केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवैधरित्या उत्खनन करुन शासनाचा महसूल बुडविणाऱ्यांवर तसेच अवैध उत्खनन करणाऱ्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या प्रशासनातील दोषी अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(२) हे खरे आहे.
(३) सदर निवेदनाच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या सूचनेनुसार जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ६/१२/२०१९ रोजी चौकशी समिती नियुक्त केली असून सदर समितीमार्फत चौकशीची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण मिळविण्याबाबत

**(४) * ६४९ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.रामदास कदम, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.नागोराव गाणार, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.रामनिवास सिंह, श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विनायकराव मेटे, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सायबर गुन्हेगारीच्या प्रमाणात वाढ झाली असून १६ हजार ५१ सायबर गुन्हयांची नोंद झाली आहे, त्यातील केवळ २८-३४ टक्के गुन्हे निकाली लागले असून उर्वरित गुन्हे प्रलंबित असल्याची बाब तसेच, सायबर गुन्ह्यांमध्ये तरुणींसह अल्पवयीन मुलींच्या लैंगिग अत्याचाराचे प्रमाण अधिक असल्याची माहिती माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गुन्ह्यांवर नियंत्रण मिळविण्याकरीता ज्याठिकाणी ५ हजार मनुष्यबळाची आवश्यकता आहे तिथे फक्त ५०० पोलीस कार्यरत असल्याने सायबर सेल सारख्या विभागाची क्षमता अधिक वाढविण्याची गरज निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबईत स्वतंत्र सायबर पोलीस ठाणे आहे, प्रत्येक पोलीस ठाण्यात सायबर कक्ष आहेत, जनजागृतीही करुनही येथे गुन्हे कमी होण्याऐवजी वाढत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण मिळविण्यासाठी या विभागात अत्याधुनिक तंत्रज्ञान व प्रशिक्षित मनुष्यबळ पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) राज्यात सन २०१८ साली ३५११ इतक्या सायबर गुन्ह्यांची नोंद झाली असून सन २०१९ साली ४८२२ सायबर गुन्ह्यांची नोंद झाली आहे. मागील ५ वर्षात एकूण १६,५१२ इतके गुन्ह्यांची नोंद झाली आहे. त्यातील एकूण ४५३० गुन्हे उघडकीस आले आहेत.

ऑनलाईन सोशल मिडीया आणि ई-मेलव्दारे महिला तसेच अल्पवयीन तरुणींना अश्लील मेसेज पाठवल्याबाबतचे सन २०१८ साली ८६७ इतक्या गुन्ह्यांची नोंद झाली आहे. सदर बाबतीत सन २०१९ साली एकूण ७९९ गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.
(२) व (३) राज्यात सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण मिळविण्यासाठी एकूण ४७ सायबर लॅब्स सुरु करण्यात आल्या होत्या. त्यापैकी ४३ सायबर लॅब्सना सायबर पोलीस ठाणे म्हणून घोषित करण्यात आले आहे. या सायबर पोलीस ठाणे/सायबर लॅब्समध्ये सुमारे ५५० पोलीस अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत. तसेच मुंबईकरीता स्वतंत्र बी.के.सी. सायबर पोलीस ठाणे अस्तित्वात आहे. त्याचप्रमाणे सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी व गुन्ह्यांचा तपास चांगल्या प्रकारे होण्याकरीता मुंबई शहरातील ९१ पोलीस ठाण्यात सायबर कक्ष देखील अस्तित्वात आहे. मुंबई पोलीस आयुक्तालयामार्फत या सायबर कक्षातील कार्यरत पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना सायबर विषयक प्रशिक्षण देण्यात आले आहे.

पोलीस आयुक्त, मुंबई शहर यांचे नियंत्रणाखाली पाच नवीन सायबर पोलीस ठाणे स्थापन करण्यात आले आहेत.

(४) सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण मिळविण्यासाठी पोलीस अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, न्यायपालिकेतील अधिकारी तसेच न्यायसहाय्यक क्षेत्रातील अधिकारी यांना सायबर गुन्ह्यांबाबत आधुनिक पध्दतीचे अन्वेषण आणि तपासाचे प्रशिक्षण देण्याचे धोरण ठेवण्यात आले आहे.

सर्व पोलीस लॅब्स/सायबर पोलीस स्टेशनकडे तपासाकरीता अत्याधुनिक यंत्रसामग्री (सॉफ्टवेयर व हार्डवेयर) जसे Solo४, Audio Video Enhancement Software इत्यादी उपलब्ध करुन देण्यात आली आहेत तसेच पोलीस अधिकारी व अंमलदार यांना उपकरणे वापरण्याचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

तथापि, सायबर गुन्ह्यांना प्रतिबंध घालण्याच्या उद्देशाने जनजागृती कार्यक्रम राबविण्याच्या योजनेंतर्गत किमान ३२५३ पोलीस अधिकारी/अंमलदार यांना प्रशिक्षण देण्यात आले व जनजागृतीचे कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यात आले असून सदर कार्यक्रमात ६४२३४ नागरिक (सहभाग-प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी, महाविद्यालयीन शिक्षक विद्यार्थी व सामान्य नागरिक) सहभागी झाले होते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील कारागृहात कैद्यांना प्रतिबंधित वस्तूंचा पुरवठा करण्यात येत असल्याबाबत

**(५) * १०७५ श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कारागृहाची वस्तू दक्षता प्रतिबंधक विभागाच्या पहाणीत अनेक कैद्यांकडे मोबाईलपासून गांजापर्यंत अनेक प्रतिबंधित वस्तू आढळून आल्या असल्याचे दिनांक ३/१०/२०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कैद्यांना प्रतिबंधित वस्तू पुरविणाऱ्यांवर कारवाई करुन कारागृहात प्रतिबंधित वस्तूंचा वापर होऊ नये यासाठी कैद्यांवर लक्ष ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) व (२) कोल्हापूर मध्यवर्ती कारागृहातील सर्कल क्र. ६ व परिसरामध्ये कर्मचाऱ्यांमार्फत दिनांक १७/१०/२०१९ रोजी विशेष झडती घेण्यात आली असता, खोली क्र. १५ सेप्रेट क्र. १५ मधील संडासमध्ये बेवारस स्थितीत एक सॅमसंग कंपनीचा मोबाईल व लिव्हगार्ड कंपनीच्या चार नग मोबाईलच्या बॅटऱ्या आढळून आल्या होत्या. सदर प्रकरणी जुना राजवाडा पोलीस स्टेशन, कोल्हापूर येथे गु.र.नं. ४/२०२० भा.दं.वि. कलम १८८, कारागृह अधिनियम, १८९४ चे कलम ४२, ४५(१२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरु आहे.

प्रतिबंधक उपाययोजना म्हणून प्रतिबंधित वस्तू कारागृहात येऊ नये याकरीता प्रत्येक व्यक्ती, वस्तू व वाहनाची तपासणी व कसून झडती घेण्यात येते. त्यासाठी हॅन्ड मेटल डिटेक्टर, डोनर फ्रेम मेटल डिटेक्टर इ. तांत्रिक साधनांचा वापर करण्यात येतो. कारागृहामध्ये मोबाईल जॅमर बसविण्यात आले असून, बंद्यांचे हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी सीसीटिव्ही यंत्रणेचा प्रभावीपणे वापर करण्यात येतो. वेळोवेळी कारागृहांमध्ये बंदी बॅरक व परिसराची विशेष झडती घेण्यात येते. पोलीस यंत्रणेकडील श्वानपथकामार्फत कारागृहाच्या आतील भागाची वेळोवेळी तपासणी देखील करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मराठवाड्यात निकृष्ट दर्जाच्या निविष्ठांचा पुरवठा करणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत

**(६) * ७६१ श्री.अंबादास दानवे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.अमरनाथ राजूरकर, ॲड.हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यात विविध खत कंपन्यांनी केलेल्या बोगस खत, किटकनाशके व निकृष्ट दर्जाचे बियाणे इ. उत्पादनामुळे ३३० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असल्याने सदर कंपन्यांविरुध्द गुन्हे नोंदवून त्यांच्याकडून नुकसान भरपाई वसुल करुन आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांचे पुनर्वसन करण्याबाबतची मागणी सामाजिक कार्यकर्ते, परभणी यांनी मा.मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहूर व किनवट (जि.नांदेड) तालुक्यातील वाई व सारखणी बाजारपेठांमध्ये कमी उगवणक्षमता असलेले बियाणे तसेच शासनाची मान्यता नसलेल्या खतांची विक्री केली जात असून याकडे कृषी विभागाची तपासणी यंत्रणा दुर्लक्ष करीत असल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निकृष्ट खते, बियाणे, किटकनाशक व बोगस खत उत्पादन करणाऱ्या कंपन्यामुळे शेतकरी आत्महत्या होत असल्याचा ठपका विभागीय आयुक्तांनी नोंदविला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निकृष्ट खते, बियाणे, किटकनाशक व बोगस खत उत्पादक कंपन्या व त्यांचे संचालकांवर कारवाई करुन आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांचे पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) या विषयाबाबतचे सामाजिक कार्यकर्ते, परभणी यांचे पत्र मा.मुख्यमंत्री कार्यालयास प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(२) माहूर व किनवट जिल्हा नांदेड येथील मौजे वाई बाजार व सारखणी बाजार पेठेतील कृषी सेवा केंद्रामध्ये कमी उगवणक्षमता असलेले बियाणे विक्री होत असल्याबाबत, तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय समितीकडे शेतकऱ्यांची तक्रार प्राप्त झालेली नाही. तसेच, मौजे वाई बाजार येथील ११ व मौजे सारखणी येथील ३ कृषी निविष्ठा केंद्रांची तपासणी केली असता, गुणवत्ता नियंत्रण निरीक्षकांना मान्यता नसलेली खते आढळून आलेली नाहीत. तसेच, मान्यता नसलेल्या खतांची विक्री होत असल्याबाबत तक्रार देखील प्राप्त नाही. वाई बाजार व सारखणी परिसरातील एकूण बियाणे १३, खते ३० व किटकनाशके ०२ नमुने तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यापैकी २ नमुने अप्रमाणित घोषित झाल्याने त्यांचेविरुध्द कारवाई सुरु करण्यात आली आहे.

(३) महाराष्ट्र दाणेदार मिश्रखते उत्पादक असोसिएशन यांनी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद येथे रिट याचिका दाखल केलेली होती. सदर रिट याचिकेमध्ये विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना प्रतिवादी करण्यात आलेले होते. सदर रिट याचिकेच्या अनुषंगाने मा.न्यायालयामध्ये विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद येथे सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या होण्यामागे जी वेगवेगळी कारणे नमूद केलेली आहेत, त्यामध्ये कमी उत्पादकता हे एक कारण असून कमी उत्पादकतेसाठी निकृष्ट दर्जाच्या निविष्ठा कारणीभूत असल्याचे मत व्यक्त केलेले आहे. तथापि, केवळ निकृष्ट दर्जाच्या निविष्ठांमुळेच शेतकरी आत्महत्या होत असल्याचा ठपका ठेवलेला नाही.

निकृष्ट दर्जाच्या निविष्ठांचा पुरवठा बाजारामध्ये होवू नये याकरीता कृषी विभागाच्या यंत्रणेकडून वेळीच प्रतिबंध करुन दक्षता घेतली जाते.

निकृष्ट दर्जाच्या निविष्ठांमुळेच आत्महत्या होत असल्याबाबत कोणताही अहवाल/तक्रार प्राप्त झालेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बोईसर (ता.जि.पालघर) मधील खाजगी वित्तीय संस्था व बांधकाम व्यावसायिकांनी ग्राहकांची फसवणूक केल्याबाबत

**(७) * ६२ श्री.प्रसाद लाड, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोईसर (ता.जि.पालघर) मधील खाजगी वित्तीय संस्था व बांधकाम व्यावसायिकांनी पंतप्रधान आवास योजनेमध्ये ४५०० ग्राहकांची फसवणूक करुन रुपये ४२ कोटींच्या सबसिडीचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी घरमालकांनी दिनांक ३ ऑक्टोबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास बोईसर एमआयडीसी पोलीस ठाण्यावर मोर्चा काढून गुन्हा नोंदविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ग्राहकांची फसवणूक करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) प्रस्तुत प्रकरणी बोईसर पोलीस ठाण्यामध्ये फसवणूक झालेबाबत तक्रार अर्ज प्राप्त झाले असुन या प्रकरणी अर्थिक गुन्हे शाखा, पालघर यांचेकडुन प्राप्त अर्जांची चौकशी सुरु आहे.

(२) सदर प्रकरणी चौकशी सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कांजूरमार्ग ते मुलुंड येथील मिठागराची जमीन गृहप्रकल्पासाठी विकसित करण्याबाबत

**(८) * १७७ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एम.एम.आर.डी.ए.) मुंबईतील कांजूरमार्ग ते मुलुंड दरम्यान असणाऱ्या ३०० एकर मिठागरांच्या जमिनींचे सात भूखंड निवासी गृहप्रकल्पांच्या उभारणीसाठी विकसित करण्याची योजना आखली असल्याचे माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेची व्यवहार्यता, भूखंड निश्चिती व आराखडा तयार करण्याकरीता सल्लागार नेमण्याची प्रक्रिया एम.एम.आर.डी.ए.ने सुरु केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर योजनेचा आराखडा व तत्सम बाबींबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१), (२) व (३) मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील मिठागर जमिनींचा समुचित वापर करण्यादृष्टीने बृहत आराखडा तयार करण्याकरीता शासन निर्णय, दिनांक २१/०८/२०१५ अन्वये शासनाने "मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास" नियुक्त केले आहे. सदर प्रक्रियेवर पर्यवेक्षण व सनियंत्रण ठेवण्यासाठी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली "उच्चाधिकार समिती" गठीत करण्यात आली आहे.

पर्यावरण विभागाकडील अद्ययावत नकाशे, पाणथळ जागेची व्याख्या आणि पर्यावरण विभागाकडून प्राप्त झालेल्या सन २०११ च्या CRZ अधिसूचनेनुसार CZMP यांची माहिती मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने संकलित केली असता, मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील ७ मिठागरांच्या क्षेत्रात झोपडपट्टीचे क्षेत्र धरुन एकत्रितपणे सुमारे ३५५.३३ एकर इतके विकसनशील क्षेत्र उपलब्ध होत असल्याचे प्रथम दर्शनी दिसून येते. उक्त विकासनशील क्षेत्रात CRZ-I क्षेत्राचा समावेश नाही. या मिठागर जमिनी केंद्र व राज्य शासन यांच्या मालकीच्या असल्याने, सदर जमिनींच्या विकासासंदर्भात दोन्ही शासनांच्या समन्वयाने धोरण ठरवावयाचे आहे. त्यासाठी जागेवर प्रत्यक्ष मोजणी करुन व बृहन्मुंबई महानगरपालिकेचा विकास आराखडा-२०३४ प्रमाणे विकसनशील आरक्षणे यांचा विचार करुन, विकासाचे धोरण ठरविणे अभिप्रेत आहे. त्याशिवाय, उक्त विकसनशील

क्षेत्राच्या निश्चित वापराविषयी निर्णय घेता येणार नाही. त्यामुळे सदर जमिनीवर वाजवी दरातील घरबांधणी प्रकल्प राबविण्यासंबंधी राज्य शासनाने अद्याप कोणताही अंतिम निर्णय घेतलेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आरे येथील वनसंपत्ती आणि आदिवासींच्या शेतजमिनीवर ड्रेब्रिज टाकण्यात आल्याबाबत

**(९) * १०९२ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फिल्मसिटीमध्ये चित्रिकरणासाठी लावण्यात येणाऱ्या सेटसाठी वनसंपत्ती आणि आदिवासीच्या शेतजमिनीवर ड्रेब्रिज टाकण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू ड्रेब्रिजमुळे फिल्मसिटीमधील झाडे आणि शेतजमिनीचे नुकसान होत असून आरे पोलीस ठाण्यामध्ये यासंदर्भात तक्रार दाखल करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

चित्रीकरणासाठी लावण्यात आलेल्या सेट करिता अनधिकृतपणे वृक्षतोड करण्यात आल्याबद्दल दिनांक १७/६/२०१९ रोजी गुन्हा नोंद आहे. मात्र, आदिवासींच्या शेतजमिनीवर डेब्रिज टाकण्यात आलेबद्दल कोणताही गुन्हा नोंद नाही. तसेच चित्रनगरी परिसरात चित्रीकरण तसेच बांधकाम करित असतांना कोणत्याही वनसंपत्तीचे नुकसान होणार नाही याची दक्षता घेण्यात येते, असे महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मांडवा ते भाऊचा धक्का अशी रो रो बोट सेवा सुरु करण्याबाबत

**(१०) * ९१२ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मांडवा ते भाऊचा धक्का जलदगतीने प्रवास व्हावा यासाठी शासनाने रो-रो बोट सेवा सुरु करण्याचा निर्णय घेतल्यानंतर आजमितीस ३ वर्षांचा कालावधी होऊनही रो रो बोट सेवा सुरु झाली नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मेरीटाईम बोर्ड रो-रो बोट सेवेच्या कामाकडे दुर्लक्ष करीत असून मेरीटाईम बोर्डाने गाळ उपसण्याचे कंत्राट वारंवार ठेकेदारांना देऊन सदर कामाचे रुपये २५ कोटींचा निधी ठेकेदारांना दिल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी अलिबाग (जि.रायगड) येथील सामाजिक कार्यकर्ते यांनी गृह विभागाकडे लेखी तक्रार केल्यानंतर गाळ उपशाची चौकशी सुरु करुन ठेकेदाराची देयके थांबविण्यात आली होती. परंतु, आता पुन्हा गाळ काढण्याची निविदा प्रसिध्द झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करुन मांडवा ते भाऊचा धक्का अशी रो-रो बोट सेवा सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख :** (१) ते (४) रो रो बोट सेवा सुरळीत व सुरक्षितपणे चालविण्याकरीता नौवहन मार्गात पुरेशी खोली उपलब्ध होण्यासाठी गाळ उपसणी करण्यात आली आहे. गाळ उपसणीसंदर्भात चौकशी सुरु आहे. या प्रकरणी ठेकेदाराची देयके थांबविण्यात आलेली नसून, त्यांची अनामत रक्कम व सुरक्षा ठेव रोखून ठेवण्यात आली आहे. रो रो सेवेसाठी जहाज दिनांक १४/०२/२०२० रोजी मुंबई बंदरात दाखल झाले असून, जहाजाच्या चाचण्या व अन्य कायदेशीर प्रक्रिया सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मोहाडी (जि.भंडारा) तालुक्यातील अवैध मुरुम खोदकाम रोखण्याबाबत

**(११) * ८२३ डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहाडी (जि.भंडारा) तालुक्यातील करडी (पालोरा) व देव्हाडा (बुज) येथील रस्त्यांच्या बांधकामासाठी एका तलावातून मुरुम खोदण्याची परवानगी असताना दुसऱ्याच तलावातून मुरुमाचे खोदकाम केले जात असल्याचा प्रकार माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी परवानगी नसताना तलावातून मुरुमाचे अवैधरित्या खोदकाम केल्याने शासनाचा महसूल बुडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अवैधरित्या मुरुमाचे खोदकाम करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) व (२) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्ह्यात पाणंद रस्ता योजनेमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१२) * २२१ डॉ.वजाहत मिर्झा, श्री.शरद रणपिसे, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झरी-जामडी, पुसद, उमरखेड, दारव्हा, दिग्रस व बाभुळगाव (जि.यवतमाळ) या तालुक्यामध्ये शेती कामासाठी आवश्यक साधनांची ने-आण करण्यासाठी आवश्यक पाणंद रस्ता योजनेतील निधी जिल्हा परिषदेने उपरोक्त योजनेकरीता न वापरता निधीचा अपहार केल्याची बाब माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर योजनेमध्ये गैरव्यवहार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करुन योजना योग्यप्रकारे कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे मोरी व पोमण (ता.वसई, जि.पालघर) येथील अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याबाबत

**(१३) * ७७४ श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मोरी (ता.वसई, जि.पालघर) येथील सर्व्हे नं. ५६, ५७ व ५८ तसेच मौजे पोमण डोंगरीपाडा येथील सर्व्हे नं. १८१, १८२९ मथुरा हॉटेलच्या मागे, मौजे पोमण येथील सर्व्हे नं. १८१, १८२ व १७४ यापैकी हिस्सा नं. ४ या शेतजमिनीवर तसेच सर्व्हे नं. १६१/१, १६२/२, १६४/१/२, १६२/२/२ येथील रॉयल इंडस्ट्रिजमध्ये कोणतीही परवानगी न घेता अवैधरित्या अनधिकृत बांधकामे सुरु असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी संबंधित विभागाकडे अनेक तक्रारी करुनही याकडे दुर्लक्ष केले जात असून शासनाचा करोडो रुपयाचा महसूल बुडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अनधिकृत बांधकामावर कारवाई न करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करुन सदरहू बांधकामे निष्कासित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१), (२) व (३) मौजे मोरी, ता.वसई, जि.पालघर येथील स.नं. ५६/१, स.नं. ५७ व स.नं. ५८ तसेच मौजे पोमण (डोंगरीपाडा) ता.वसई, जि.पालघर येथील स.नं. १८१/१, स.नं. १८२/२, स.नं. १७४/४, स.नं. १६१, स.नं. १६२/२, स.नं. १६४/१/२ मध्ये अनधिकृत बांधकाम निदर्शनास आले असून स.नं. १८२९ व १६२/२/२ हे दोन्ही सर्व्हे नंबर मौजे पोमण येथे आढळून येत नाही.

उक्त अनधिकृत बांधकामे निष्कासित करणेबाबत उपविभागीय अधिकारी, वसई यांना लोकप्रतिनिधी यांचे निवेदन प्राप्त झाले आहे.

उक्त अनधिकृत बांधकामधारकांना महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४५ अन्वये नोटीसा बजावण्यात आलेल्या असून उक्त अनधिकृत बांधकामधारकांकडून दंडनिय रक्कम वसूल करण्यात आली आहे. तसेच सदर अनधिकृत बांधकामधारकांना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ अन्वये नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खेड, दापोली व मंडणगड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील अवैध वाळू उत्खनन रोखण्याबाबत

**(१४) * ९६९ श्री.रामदास कदम :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड, दापोली व मंडणगड (जि.रत्नागिरी) तालुक्यांमध्ये गेल्या काही महिन्यांपासून अवैधरित्या वाळू उत्खनन करीत असूनही स्थानिक प्रशासकीय अधिकारी वाळूमाफियांवर कारवाई न करता याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बहिरवली (ता.खेड) व करंबवणे (ता.चिपळूण) या दोन गावांमधील जगबुडी नदीपात्रात ड्रेझर व हातपाटी वाळू व्यावसायिकांमध्ये वाद निर्माण झाला असून याबाबत महसूल, जिल्हा खनिकर्म विभाग व स्थानिक पोलीस अधिकारी यांनी कोणतीच कारवाई केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कुडोशी, आंबवली, आस्तान व बीड (ता.खेड) या नदीपात्रात बेकायदेशीर वाळू उत्खनन होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवैधरित्या वाळू उपसा करणाऱ्या वाळूमाफियांवर तसेच त्यांना सहकार्य करणाऱ्या प्रशासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कारवाई करुन अवैध वाळू उपसा रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१), (२), (३) व (४) खेड, दापोली व मंडणगड (जि.रत्नागिरी) तालुक्यांमध्ये वाळूच्या अवैध उत्खनन व वाहतूकीबाबत स्थानिक अधिकारी कारवाई न करता दुर्लक्ष करत असल्याची बाब तसेच बहिरवली (ता.खेड) व करंबवणे (ता.चिपळूण) या दोन गावांमधील जगबुडी नदीपात्रात ड्रेझर व हातपाटी वाळू व्यावसायिकांमध्ये वाद निर्माण झाल्याची बाब निदर्शनास आली नाही.

कुडोशी व आस्तान (ता.खेड) येथे वाळूचे अनधिकृत उत्खनन होत असल्याचे निदर्शनास आले असून मौजे कुडोशी येथे अवैध वाळूसाठ्याच्या एका प्रकरणी दंडात्मक कार्यवाही करुन रुपये २,५२,०००/- इतकी रक्कम शासनजमा करण्यात आली आहे. तर मौजे आस्तान येथे अवैध वाळूसाठ्याच्या एका प्रकरणी दंडात्मक कार्यवाही करुन रुपये २५,२००/- इतकी रक्कम शासनजमा करण्यात आली आहे. मौजे आंबवली व वाडीबीड येथे नदीपात्रात वाळूचे बेकायदेशीर उत्खनन होत असल्याची बाब निदर्शनास आली नाही.

गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुकीला प्रतिबंध घालण्यासाठी जिल्हा व तालुकास्तरावर भरारी पथकांची स्थापना करण्यात आली आहे. सदर पथकांमार्फत रत्नागिरी जिल्हयात माहे एप्रिल, २०१९ ते जानेवारी, २०२० या कालावधीत गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुकीच्या ८४

प्रकरणी दंडात्मक कार्यवाही करुन रुपये ५५.०६ लक्ष इतकी रक्कम शासनजमा करण्यात आली आहे. गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुकीच्या ६ प्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिवाजी पार्क, माहिम (मुंबई) येथे वृध्द दामप्त्याचे लुटारुंनी दागिने लुटल्याबाबत

**(१५) * ६०७ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माहिम (मुंबई) येथे शिवाजी पार्क मैदानावर मॉर्निंग वॉकसाठी गेलेल्या वृध्द दामप्त्यांना लुटारुंनी पोलीस असल्याचे भासवून त्यांचे १२ तोळे सोन्याचे दागिने लुटल्याचा प्रकार दिनांक ४ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने लुटारुंना अटक करुन वृध्द दामप्त्याचे दागिने परत मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) होय, हे खरे आहे.
(२) प्रस्तुत प्रकरणी माहिम पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. २/२०२० भा.दं.वि., कलम १७०, ४२०, ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. नमूद गुन्हयात निष्पन्न झालेल्या २ फरार आरोपीतांचा शोध घेण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील गड किल्ले व निसर्गरम्य स्थळांच्या ठिकाणी सुरक्षा व्यवस्था पुरविण्याबाबत

**(१६) * ५९८ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्रीमती स्मिता वाघ, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारदरा येथील सांधण व्हॅली परिसरात गर्दीचे व्हायरल झालेल्या छायाचित्रणाबद्दल माहिती घेतली असता एका आयोजक ग्रुपने ५०० ते ६०० जणांचा गट आणून या निसर्गरम्य स्थळी ट्रेकच्या नावाखाली क्षमतेपलीकडे गर्दी केल्याने येथे अपघात होण्याची शक्यता निर्माण झाल्याची चिंता एका अनुभवी ट्रेकर्सकडून व्यक्त करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोणावळा, भंडारदरा परिसरातील अनेक ट्रेकिंग स्पॉट परिसरात पर्यटकांकडून डीजे लावून धांगडधिंगा करणे, दारुपाट्र्या करणे आदी कार्यक्रम सुरु असल्याचे दिनांक ३० डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून यापुर्वी देखील काही अतिउत्साही पर्यटकांचा पाण्यात बुडून तसेच सेल्फीच्या नादात दरीत पडून मृत्यू झाल्याच्या घटनाही घडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील गड किल्ले व निसर्गरम्य स्थळांच्या ठिकाणी अपघाताच्यादृष्टीने सुरक्षा व्यवस्था पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) या संदर्भात पोलिसांकडे कोणतीही तक्रार प्राप्त नाही.

(२) दिनांक ३०/१२/२०१९ रोजी वा त्यादरम्यान लोणावळा, भंडारदरा परिसरातील अनेक ट्रेकिंग स्पॉट परिसरात पर्यटकांकडून डीजे लावून धांगडधिंगा करणे, दारुपाट्र्या करणे हे निदर्शनास आलेले नाही. तथापि, यापूर्वी भंडारदरा येथे ४ पर्यटकांचा व लोणावळा येथे ६ पर्यटकांचा मृत्यू झाल्याच्या घटना घडलेल्या आहेत.

(३) राज्यातील गडकिल्ले व निसर्गरम्य स्थळांच्या ठिकाणी सुरक्षा व्यवस्था पुरविण्याबाबत खालील उपाययोजना करण्यात आल्या आहेत :-

१) अपघातासारखे अनुचित प्रकार घडू नये याकरीता वेगवेगळे मार्गदर्शनपर फलक लावण्यात आलेले आहेत.

२) पर्यटकांकरीता पर्यटन पोलीस पथक नेमण्यात आले असून, त्यांचेमार्फत गस्त घालण्यात येत आहे.

३) धोकादायक ठिकाणी लोखंडी रिलींग बसविण्याबाबत संबंधितांना प्रस्ताव सादर करण्यात आले आहे.

४) वेळोवेळी पोलिसांची गस्त घालण्यात येते.

५) पाण्यात बुडणाऱ्या व्यक्तींना बाहेर काढण्यासाठी लाईफगार्ड व स्पीड बोटींची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

६) ज्या ठिकाणी रस्त्यालगत खोल समुद्र किनारे आहेत, अशा समुद्र किनारी भरतीच्यावेळी समुद्रालगत कट्ट्यावर व फुटपाथवर बसण्यास किंवा उभे रहाण्यास मज्जाव केला जातो. तसेच ज्या ठिकाणी समुद्राच्या लाटांचे पाणी मोठ्या प्रमाणावर बाहेर फेकले जाते अशा ठिकाणी गस्तीवरील पोलीस अधिकारी अंमलदार हे लांब दोरखंडाचा वापर करुन पर्यटकांना समुद्रात जाण्यापासून मज्जाव करतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मरोळ, दादर, घाटकोपर पोलीस वसाहतीतील सदनिका भाडेतत्वावर नियमित करण्याबाबत

**(१७) * १८३ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.आनंद ठाकूर : तारांकित प्रश्न क्रमांक ४४३५१ ला दिनांक २८ नोव्हेंबर, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मरोळ, दादर, घाटकोपर पोलीस वसाहतीतील सदनिका मृत पोलीस कर्मचाऱ्यांच्या विधवा महिला यांना भाडेतत्वावर नियमित करण्याबाबत दिनांक १९/०६/२०१८ रोजी मा.मुख्यमंत्री यांनी बैठक आयोजित करुन धोरण तयार करण्याचे आश्वासन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्तव्यावर कार्यरत असणाऱ्या पोलीस दलातील हवालदार, सहाय्यक पोलीस निरीक्षक यांना अचानक मृत्यू आल्यास त्यांना सदनिका सेवानिवृत्त होईपर्यंत आणि वाढीव भाडेपट्टी कमी करण्याबाबत शासनाने धोरण तयार केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मृत पोलीस कर्मचाऱ्यांच्या विधवा महिलांना आलेले भाडेवाढ निवृत्तीवेतनातून कपात करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मृत पोलीस कर्मचाऱ्यांच्या विधवा महिलांना त्यांची घरे भाडेतत्वावर वितरीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) दादर रेल्वे पोलीस वसाहत, मरोळ पोलीस कॅम्प, इत्यादी पोलीस वसाहतींमध्ये राहणाऱ्या मृत पोलीस कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना आकारण्यात येणारे वाढीव भाडेदर आणि सेवा निवासस्थाने रिक्त करण्याबाबत देण्यात आलेल्या नोटिशी यासंदर्भात धोरण तयार करुन सादर करण्याचे निदेश मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १९/०६/२०१८ रोजी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत देण्यात आले होते.

(२) व (३) शासन निर्णय, गृह विभाग, दिनांक १७/०६/२०११ अनुसार कर्तव्यावर कार्यरत असताना पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचा अचानक मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबियांना तीन वर्षापर्यंत किंवा सेवानिवृत्तीचा दिनांक यापैकी जो दिनांक आधी असेल त्या दिनांकापर्यंत अनुज्ञप्ती शुल्क भरुन सेवा निवासस्थानात राहण्यास परवानगी देण्यात येते. या कालावधीनंतर महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन), १९८२ मधील नियम १३४ व १४२ यामधील तरतुदीनुसार आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही करण्यात येते.

(४) पोलीस सेवा निवासस्थाने ही पोलीस दलात सेवेत कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना वाटप करण्याच्या प्रयोजनासाठी आहेत. ही सेवा निवासस्थाने भाड्याने वितरीत करण्याबाबत शासनाचे कोणतेही धोरण नाही.

तथापि, शासन निर्णय, गृह विभाग, दिनांक १७/०६/२०११ आणि शासन निर्णय, गृह विभाग, दिनांक १८/११/२००५ अनुसार पात्र प्रकरणांमध्ये सेवा निवासस्थान ताब्यात ठेवण्यास मुदतवाढ देण्याबाबत कार्यवाही करण्यात येते. उक्त शासन निर्णयांमधील तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत :-

i. शासन निर्णय, दिनांक १७/०६/२०११ "कर्तव्य बजावित असताना घडणाऱ्या दुर्घटनामुळे एखादा पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचा मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबियांना ३ वर्षापर्यंत किंवा त्याचा सेवानिवृत्तीचा दिनांक यापैकी जो दिनांक आधी असेल त्या दिनांकापर्यंत शासकीय निवासस्थानात राहण्यास" परवानगी देण्याबाबत तरतूद आहे.

ii. शासन निर्णय, दिनांक १८/११/२००५ "बदली/सेवानिवृत्ती/सक्तीने सेवानिवृत्ती/बडतर्फी/ वैद्यकीय अपात्र/बेपत्ता/सेवेत असताना अकाली निधन इ. प्रकरणी घटना घडल्यापासून" संबंधित पोलीस अधिकाऱ्यास किंवा, यथास्थिती, त्यांच्या कुटुंबियांना सेवा निवासस्थान ताब्यात ठेवण्यास जास्तीत जास्त नऊ महिने मुदतवाढ देण्याची तरतूद आहे. तसेच विवक्षित प्रकरणांमध्ये योग्ययोग्यता तपासून नऊ महिन्यांपेक्षा जास्त मुदतवाढ देण्याबाबत तरतूद आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील नागरिकांना रोजगार हमी योजनेंतर्गत कामे देण्याबाबत

**(१८) * १३४९ श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यात रोजगार हमी योजनेंतर्गत ९ हजार मजूरांची नोंद झाली असून ठाणे जिल्ह्याच्या दुर्गम आदिवासी भागातील नागरिकांचे रोजगाराअभावी स्थलांतर होत असून अनेक मेहनतीच्या कामांची मजूरांना कमी मजूरी मिळत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुक्यातील मजूरांच्या संख्येनुसार सर्वांना उदरनिर्वाह करण्यासाठी अधिकाधिक कामे देण्याची मागणी मजूरांकडून व त्यांच्या संघटनांकडून होत असून मजूरांना दिवसासाठी केवळ रुपये २०६/- इतकीच मजूरी मिळत असून, या तुटपुंज्या उत्पन्नात त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह होत नसल्याने सदर मजूरी रुपये ३५०/- इतकी करावी अशी मागणी श्रमजीवी संघटनेने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शहापूर तालुक्यातील नागरिकांना रोजगार हमी योजनेंतर्गत कामे देऊन वाढीव मजूरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१), (२) व (३) नाही, हे खरे नाही.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत कामाचा मजूरी दर केंद्र शासनाकडून ठरविण्यात येतो. त्यानुसार सन २०१९-२०२० करीता महाराष्ट्र राज्यासाठी सदर मजूरी दर रुपये २०६/- असा ठरवून देण्यात आला आहे. त्यानुसार मजूरी दिली जाते. तसेच, मजूरांच्या मागणीप्रमाणे कामे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरात थायी मांगूर माशाची विक्री रोखण्याबाबत

**(१९) * १६४३ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्रीमती स्मिता वाघ, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानवी आरोग्याला व पर्यावरणाला घातक असलेल्या तसेच आतड्याचा कर्करोग, रक्त, मूत्रपिंड, यकृत इत्यादी आजार होण्याचा धोका असलेल्या आणि केंद्र व राज्य शासनाने बंदी घातलेल्या “थायी मांगूर” या स्थलांतरीत माशाची मुंबईसह आजूबाजूच्या शहरांमध्ये सर्रास विक्री होत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन थायी मांगूर माशाची विक्री करणाऱ्यांवर कारवाई करुन माशाची विक्री रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख :** (१) होय, हे खरे आहे.

(२) केंद्र शासनाने दिनांक १९/१२/१९९७ व दिनांक १७/०७/२००० रोजीच्या पत्रान्वये प्रतिबंधित थायी मांगूर (Clarias Gariepinus) माशांचे संवर्धन, बीज उत्पादनावर बंदी घातलेली आहे.

मा.राष्ट्रीय हरित लवाद, नवी दिल्ली यांनी Original Application No. ३८१ of २०१८ च्या अनुषंगाने दिनांक २२/०१/२०१९ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त, प्रादेशिक उपायुक्त मत्स्यव्यवसाय व सर्व सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय यांना दिनांक ३०/०१/२०१९ च्या पत्रान्वये प्रतिबंधित मांगूर माशांचे मत्स्यबीज उत्पादन, संवर्धन, वाहतूक व विक्री करणाऱ्या मत्स्यसंवर्धकावर कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

त्यानुषंगाने खालीलप्रमाणे प्रतिबंधित मांगूर माशांचे मत्स्यसाठे नष्ट करण्याबाबत कार्यवाही करण्यात आली आहे.

| अ.क्र. | प्रादेशिक विभागाचे नाव | नष्ट केलेला मत्स्यसाठा (टन) | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मुंबई | १५ | मा.राष्ट्रीय हरित लवाद, नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या आदेशाचे उल्लंघन केल्याने भा.दं.वि. १८८ अन्वये कार्यवाही केलेली आहे. |
| २ | पुणे | १४ | |
| ३ | नागपूर | ३.५ | |
| | एकूण | ३२.५ | |

मा.राष्ट्रीय हरित लवाद, नवी दिल्ली यांचे दिनांक २२/०१/२०१९ रोजीच्या आदेशाचे उल्लंघन केल्यास सदर मत्स्यसंवर्धकांवर भा.दं.वि. १८८ अन्वये कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जिंतूर (जि.परभणी) तालुक्यातील अवैध गौण खनिज उत्खनन रोखण्याबाबत

**(२०) * १६७० श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिंतूर (जि.परभणी) तालुक्यातील डोंगराळ भागात अवैध गौण खनिज उत्खननाने डोंगर, दऱ्या नष्ट होत असून दररोज शेकडो वाहनांतून मुरुमाची व दगडाची अवैधरित्या वाहतूक केली जात असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मैनापुरीचा माळ, नेमगिरी परिसरातील डोंगर, ज्ञानोपासक महाविद्यालय परिसरातील १०० एकरचा परिसर, पुंगळा गाव परिसरातील डोंगर परिसरातून लाखो ब्रास गौण खनिज उत्खनन केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संगनमताने अवैधरित्या गौण खनिज उत्खनन होत असल्याने शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडविला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जिंतूर तालुक्यातील अवैध गौण खनिज उत्खननास सहकार्य करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करुन अवैध गौण खनिज उत्खनन रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१), (२), (३) व (४) जिंतूर तालुक्यात मैनापुरी, नेमगिरी, ज्ञानोपासक महाविद्यालय व पुंगळा येथील जमिनीतून मुरुम परवानगीबाबतचे अर्ज तसेच नियमानुसार गौण खनिज उत्खनन व वाहतुकीकरीता स्वामित्वधनाच्या रक्कमेचा भरणा तहसिलदार यांचेकडे केल्यानंतरच रितसर परवानगी देण्यात येत आहे.

मौजे पुंगळा येथील गट क्र. ११०/२ व १०७/१ या ठिकाणाहून एकूण २५५० ब्रास मुरुम उत्खनन व वाहतूक करण्यास रितसर स्वामित्वधनाचा भरणा केल्यानंतर परवानगी देण्यात आली आहे. तसेच जिंतूर-परभणी राष्ट्रीय महामार्गाच्या कामाकरीता मौजे पुंगळा येथील सिंचन तलावातून १५००० घन मीटर मुरुम उत्खननाची परवानगी देण्यात आली आहे.

जिंतूर तालुक्यात गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुकीला प्रतिबंध घालण्यासाठी तालुकास्तरीय भरारी पथकाची स्थापना करण्यात आली असून सदर पथकामार्फत माहे एप्रिल, २०१९ ते जानेवारी, २०२० या कालावधीत गौण खनिजाचे अवैध वाहतुकीच्या ५९ प्रकरणी दंडात्मक कार्यवाही करुन रुपये ५३.१८ लक्ष इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे. तसेच ३ प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तळेखोल (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग) परिसरातील अवैध दगड उत्खनन बंद करण्याबाबत

**(२१) * १९९६ श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळेखोल (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग) परिसरात गेल्या काही वर्षापासून खाण कंपन्या कोट्यवधी रुपये किंमतीचे दगड अवैधरित्या उत्खनन करुन इतर राज्यात वाहतूक करीत असून दगड उत्खननामुळे प्रदूषण वाढणे, रस्त्याची दुरवस्था होणे, पाणी साठे नष्ट होणे, स्थानिक नागरिकांचे आरोग्य धोक्यात येणे असे प्रकार घडत असल्याने तेथील ग्रामस्थांनी मागील काही वर्षापासून सातत्याने मा.पालकमंत्री, सिंधुदुर्ग, जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग, तहसिलदार, दोडामार्ग, खनिकर्म अधिकारी, सिंधुदुर्ग आदींकडे लेखी निवेदनाव्दारे तक्रारी करुन दगड उत्खनन बंद करण्याबाबत मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मागणीबाबत महसूल प्रशासनाकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असून सदरहू अवैध दगड उत्खननाविरोधात कोणतीही कारवाई केली जात नसल्याने तेथील ग्रामस्थांनी, सरपंच व महिलांनी दिनांक ९ डिसेंबर, २०१९ रोजी तहसिलदार कार्यालयासमोर आंदोलन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवैध दगड उत्खनन बंद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) होय, हे खरे आहे.

(२) खाणपट्टाधारक नियमांचे पालन करत नसल्याचे विरोधात दिनांक १९/१२/२०१९ रोजी तळेखोल ग्रामस्थ, सरपंच व महिलांनी तहसिल कार्यालय, दोडामार्ग येथे आंदोलन केले आहे.

(३) दिनांक १३/१२/२०१९ रोजी मौजे तळेखोल येथील स.नं. १९१/१ या मिळकतीतून ५० ब्रास काळा दगडाचे अवैध उत्खनन केल्याप्रकरणी तहसिलदार, दोडामार्ग यांनी संबंधितास रुपये १,४५,०००/- इतक्या दंडात्मक रकमेचा आदेश पारीत केला असून वसुलीची कार्यवाही सुरु आहे.

मौजे तळेखोल, ता.दोडामार्ग येथील सर्व्हे नं. ३३८/१ब, क्षेत्र ०.८० हे.आर. ह्या खाणपट्टयाजवळून नैसर्गिक पाणी प्रवाह बंद झाल्याचे तसेच सदर खाणपट्टयाजवळून प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत तळेखोल ते उसप

या रस्त्याचे काम सुरु असल्याचे निदर्शनास आल्याने अपर जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांच्या दिनांक २४/१२/२०१९ रोजीच्या आदेशान्वये सदर खाणपट्टा पुढील आदेशापर्यंत उत्खनन व वाहतुकीस बंद करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गेवराई व माजलगाव (जि.बीड) तालुक्यातील अवैध वाळू उत्खनन रोखण्याबाबत

**(२२) * १९७५ श्री.विनायकराव मेटे : तारांकित प्रश्न क्रमांक ४७९४३ ला दिनांक २५ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गेवराई (जि.बीड) तालुक्यातील गोदावरी नदी, चकलांबा व तलवाडा येथील क्षेत्रातून तसेच माजलगाव (जि.बीड) तालुक्यातील नदीपात्रातून वाळू माफिया अवैधरित्या कोट्यवधी रुपयांचा वाळू उपसा करुन वाहतूक करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अवैध वाळू उपसाप्रकरणी चकलांबा व तलवाडा पोलीस प्रशासनातील अधिकारी व महसूल अधिकारी यांचेकडे विविध संघटनांनी आंदोलने करुन निवेदने दिली असूनही शासनाने कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वाळू माफियांसोबत माजलगाव ग्रामीण पोलीस ठाणे, शहर पोलीस ठाणे व महसुली यंत्रणामधील अधिकारी व कर्मचारी आर्थिक संगनमत करुन याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गेवराई व माजलगाव तालुक्यातील वाळू माफिया तसेच वाळू माफियांना सहकार्य करणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई करुन अवैध वाळू उत्खनन रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१), (२), (३) व (४) गेवराई तालुक्यातील गोदावरी नदी, चकलांबा व तलवाडा येथील क्षेत्रातून तसेच माजलगाव तालुक्यातील नदीपात्रातून वाळूचा अवैध उपसा झाल्याची बाब निदर्शनास आली हे अंशत: खरे आहे.

गेवराई व माजलगाव (जि.बीड) तालुक्यात गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुकीला प्रतिबंध घालण्यासाठी महसूल व पोलिसांची भरारी पथके स्थापन करण्यात आली असून सदर पथकामार्फत गेवराई तालुक्यात माहे एप्रिल, २०१९ ते जानेवारी, २०२० या कालावधीत वाळूच्या अवैध वाहतुकीच्या ४३ प्रकरणी दंडात्मक कार्यवाही करुन रुपये ८५,५२,०००/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे.

माजलगाव तालुक्यात माहे एप्रिल, २०१९ ते जानेवारी, २०२० या कालावधीत वाळूच्या अवैध वाहतुकीच्या ४९ प्रकरणी दंडात्मक कार्यवाही करुन रुपये ५८,०७,०००/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे.

तसेच लिलाव न झालेले वाळूघाट फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४४ नुसार प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित केले असून प्रतिबंधित क्षेत्रामध्ये कोणत्याही व्यक्तीस (मजूर, कंत्राटदार, वाहनचालक) तसेच वाहनांस प्रतिबंध करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्हयातील स्पीड बोटींची दुरुस्ती करण्याबाबत

**(२३) * २४१७ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील सागरी सुरक्षेसाठी असलेल्या ९ स्पीड बोटींपैकी ४ बोटी दोन वर्षापासून बंद अवस्थेत असल्याने सागरी किनारपट्टीवर सुरक्षिततेच्यादृष्टीने गस्त घालण्यात पोलिसांना अडचणी निर्माण होत असल्याचे माहे जानेवारी, २०२० च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बोटी दुरुस्तीसाठी परिवहन विभागाकडे देण्यात आल्या असून बोटी दुरुस्तीअभावी तशाच पडून आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू बोटींची दुरुस्ती करुन स्पीड बोट कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) व (२) रत्नागिरी जिल्हयात सागरी सुरक्षेकरीता एकूण ९ स्पीड बोटी असून, सद्य:स्थितीत त्यापैकी ५ बोटी या सुस्थितीत असून कार्यरत आहेत. तसेच, उर्वरीत ४ स्पीड बोटींपैकी १ स्पीड बोटीच्या दुरुस्तीचे काम पूर्ण झाले असून चाचणीअंती सदरील बोट लवकरच सुरु होणार असून अन्य १ बोट ही जुनी असल्याने त्याची निकामीकरण करण्याची कार्यवाही सुरु आहे. त्याचप्रमाणे २ स्पीड बोटीमध्ये मोठे दोष उद्‌भवल्याने नादुरुस्त असून सदर बोटींच्या दुरुस्तीची कार्यवाही सुरु असून नजीकच्या कालावधीत सदरील बोटी सागरी गस्तीकरीता उपलब्ध होणार आहेत. याव्यतिरिक्त, दोन खाजगी ट्रॉलर्स भाडेतत्वावर घेण्यात आलेले असून त्याव्दारे विनाखंड सागरीगस्त सुरु आहे.
(३) उपरोक्त भाग १ व २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे नादुरुस्त बोटींची दुरुस्ती करुन सदरील बोटी तात्काळ सागरीगस्तीकरीता उपलब्ध करुन देण्यात येणार आाहेत.

या व्यतिरिक्त, पोलीस दलाकडील एकूण ५५ स्पीड बोटींचा वार्षिक देखभाल व दुरुस्ती करार विहित निविदा प्रक्रियाअंती न्युनतम ठरलेल्या निविदाकार कंपनीसोबत करण्यात आला असून त्यांचेव्दारे सर्व बोटींची देखभाल व दुरुस्ती करुन घेण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात मासे उत्पन्न बाजार समिती स्थापन करण्याबाबत

**(२४) * २४४५ श्री.नागोराव गाणार, श्री.विजय उर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मच्छीमारांना हमीभाव मिळावा आणि कृषी उत्पन्न बाजार समितीप्रमाणे मच्छिमारांचीही मासे उत्पन्न बाजार समिती स्थापन करावी अशी मागणी अलिबाग येथील वेस्टकोस्ट पर्ससीन नेट वेलफेअर असोशिएशन तर्फे करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख :** (१) हे खरे नाही, वेस्ट कोस्ट पर्ससीन नेट वेलफेअर असोसिएशन यांच्या मागणीचे निवेदन या विभागास प्राप्त झालेले नाही.

(२) व (३) मत्स्यव्यवसाय शेती या सदरात मोडत नसल्याने सदर व्यवसायासाठी बाजार समितीचे गठन करण्यात आलेले नाही. तथापि, राष्ट्रीय मत्स्य विकास बोर्ड तर्फे उपलब्ध निधीतून महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळामार्फत राज्यात मागणीप्रमाणे ४७ मत्स्यबाजार बांधण्यात आलेले आहेत. मत्स्य विक्रीसाठी मत्स्य बाजार बांधणे असे सध्याचे धोरण आहे.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील दगडखाणी बंद असल्याबाबत

**(२५) * २५४३ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील सुमारे १५० दगडखाणी गेल्या दोन वर्षापासून पर्यावरण विभागाचा ना-हरकत दाखला नसल्याने बंद असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिडको आणि वन विभाग यांनी तपासणी करुन सदर अहवाल पर्यावरण समितीकडे पाठविण्यात आला होता, परंतु जिल्हा पर्यावरण समिती बरखास्त करण्यात आल्यामुळे दगडखाणी सुरु होण्याची बाब सिडको, वन विभाग आणि पर्यावरण विभाग यांच्या संयुक्त निर्णयावर अवलंबून आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दगडखाणी मालकांना पर्यावरण विभागाचे ना-हरकत दाखला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात** : (१), (२) व (३) ठाणे जिल्ह्यातील पर्यावरण अनुमतीशिवाय तसेच संबंधितांनी पर्यावरण अनुमतीसाठी प्रस्ताव सादर न केल्याने ३२ दगडखाणी बंद असल्याचे निदर्शनास आले आहे.

सिडकोने त्यांचे अखत्यारीतील ७५ दगडखाणींच्या जागेवर पंतप्रधान आवास योजनेंतर्गत महागृह निर्माण प्रकल्प प्रस्तावित केलेला असून सदर जागेतील दगडखाणीकरीता पर्यावरण अनुमतीसाठी ना-हरकत देता येणार नाही, असे सिडकोने दिनांक २४/२/२०२० रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, ठाणे यांना कळविले आहे. त्यामुळे सिडकोच्या अखत्यारीतील ७५ दगडखाणी बंद आहेत.

वन विभागाचे अखत्यारीतील १९ दगडखाणींपैकी २ दगडखाणींना राज्यस्तरीय पर्यावरण समितीची पर्यावरण अनुमती प्राप्त झाल्याने पूर्ववत सुरु करण्यात आल्या आहेत. तर संबंधितांनी पर्यावरण अनुमतीसाठी प्रस्ताव सादर न केल्याने उर्वरित १७ दगडखाणी बंद आहेत.

एम.आय.डी.सी. महापे, नवी मुंबई यांचे अखत्यारीतील एका दगडखाणीस पर्यावरण अनुमती देण्यात आली आहे.

तसेच ठाणे जिल्ह्यातील खाजगी जमिनीवरील १८ दगडखाणींपैकी ३ दगडखाणींना पर्यावरण अनुमती मंजूर करण्यात आली आहे. तर खाजगी जागेवरील उर्वरित १५ दगडखाणीकरीता पर्यावरण अनुमतीचे परिपूर्ण प्रस्ताव खाजगी जमीनधारकाकडून प्राप्त झाले नसल्याने सदर दगडखाणी बंद आहेत.

मा.राष्ट्रीय हरित लवाद, नवी दिल्ली यांचे दिनांक ११/१२/२०१८ रोजीचे आदेशान्वये जिल्हास्तरीय पर्यावरण समित्या बरखास्त झाल्याने राज्यस्तरीय पर्यावरण समितीकडून संबंधित दगडखाणींकरीता पर्यावरण अनुमती घेणे आवश्यक आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कृषी मित्रांनी शेतकऱ्यांना व कृषी सहाय्यकांना माहिती व प्रकाशन पुस्तक देण्याचे बंद केल्याबाबत

**(२६) * २५५२ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अरुणकाका जगताप :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या कृषी खात्याच्या योजना, अनुदाने, बी-बियाणे औषधे, पशुधनाविषयी माहिती त्याचे साहित्य कृषी खात्याची प्रकाशने याची माहिती शेतकऱ्यांना देण्यासाठी गावपातळीवर ग्रामसभेमार्फत कृषी मित्र यांची दरवर्षी नेमणूक करण्याची योजना शासनाने अंमलात आणली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सध्या २२ हजारापेक्षा जास्त कृषी मित्रांची संख्या असून दरवर्षी रुपये २६ कोटी ४० लक्ष इतका निधी त्यांचेवर खर्च होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कृषी मित्रांना सुरुवातीच्या काळात प्रतिमाह रुपये ५००/- इतके मानधन दिले जात असताना तत्कालीन शासनाने हे मानधन वाढवून रुपये १०००/- इतके केले, मात्र त्यानंतर कृषी मित्रांनी शेतकऱ्यांना व कृषी सहाय्यकांना कोणतीही माहिती व प्रकाशन पुस्तक देण्याचे बंद केले असल्याचे दिनांक २४ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) अंशत: खरे आहे.

(आत्मा) अंतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार शेतकरी मित्राची निवड ही ग्रामपंचायतीच्या ठरावानुसार दोन महसूल गांवाकरीता १ शेतकरी मित्राची निवड करण्यात येते.

(२) हे खरे नाही, तथापि, राज्यात सद्य:स्थितीमध्ये १६७२४ शेतकरी मित्र निवडले आहेत. सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षामध्ये शेतकरी मित्रांवर माहे जानेवारी, २०२० अखेर रक्कम रुपये २.९९ कोटी खर्च झालेला आहे.

(३) आत्मा ही योजना केंद्र पुरस्कृत योजना आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे शेतकरी मित्र ही बाब केंद्र:राज्य (५०:५०) या प्रमाणात राबविण्यात येत असून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना-२०१८ अन्वये निवड करण्यात आलेल्या शेतकरी मित्रांना योजनांच्या प्रचार प्रसिध्दीकरीता शेतकऱ्यांच्या शेतावर भेटी देण्याकरीता होणारा प्रवास व इतर शेतकऱ्यांशी दुरध्वनीव्दारे/ भ्रमणध्वनीव्दारे संपर्क करणेकरीता होणारा खर्च, त्यांना आवश्यक असलेली शेती विषयक पुस्तके, मासिक खरेदी करणे, कृषी व कृषी संलग्न विभागांतर्गत विविध योजनांची माहिती घेणेकरीता संबंधित कार्यालयास संपर्क करणे याकरीता त्यांना येणाऱ्या खर्चाची प्रतिपुर्ती म्हणून प्रतिमहिना रक्कम रुपये १०००/- देय आहेत. तसेच दिनांक २४/१/२०२० अथवा त्यादरम्यान शेतकरी मित्रांकडून कोणतीही प्रकाशने किंवा पुस्तके देण्याबाबत मागणी/निवेदन प्राप्त झालेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंगणघाट (जि.वर्धा) येथील प्राध्यापक तरुणीला जिवंत जाळल्याच्या घटनेबाबत

**(२७) * २५८४ श्री.अरुणभाऊ अडसड, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगणघाट (जि.वर्धा) येथील २४ वर्षीय प्राध्यापक तरुणीवर एकतर्फी प्रेमातून पेट्रोल टाकून तिला जिवंत जाळण्याची घटना दिनांक ३ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हल्ल्यात पिडीत प्राध्यापक ४० टक्के भाजली असून तिचा चेहरा, डोळे आणि मान गंभीररित्या भाजल्यामुळे असल्याने तरुणीची प्रकृती गंभीर असून तिच्यावर नागपूरमधील ऑरेंज सिटी रुग्णालयात उपचार सुरु आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने हल्ल्यातील आरोपीस अटक करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) होय.

(२) व (३) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून हिंगणघाट पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ५०/२०२० भा.दं.वि. कलम ३०७, ३२६(अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तथापि, पिडित महिलेचा दिनांक १०/०२/२०२० रोजी मृत्यू झाल्यामुळे आरोपीविरूध्द सदर गुन्हयात भा.दं.वि. कलम ३०२ अन्वये वाढ करण्यात आली आहे. सदर गुन्हयातील आरोपीताला अटक करण्यात आली असून सध्या आरोपी न्यायालयीन कोठडीत आहे. सद्य:स्थितीत सदर गुन्हयाचा तपास चालू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अजनी (जि.नागपूर) येथील खाजगी कोचिंग क्लासमधील विद्यार्थीनीवर अत्याचार झाल्याबाबत

**(२८) * १३६६ श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे अजनी भागात साईबल चौधरी या शिक्षकाने त्याच्या कोचिंग क्लासमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनीवर सुमारे ४ महिने लैंगिक अत्याचार केले असल्याची घटना माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील अनेक खाजगी कोचिंग क्लासमध्ये अग्निसुरक्षेबाबत आणि खाजगी कोचिंग क्लासमधील गैरप्रकार रोखण्याच्यादृष्टीने विद्यार्थीनींच्या सुरक्षिततेबाबत कोणत्याही उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील कोचिंग क्लासमध्ये सुरु असलेले गैरप्रकार रोखण्यासाठी नियमावली वा कायदा तयार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) होय.
(२) शिकवणी वर्ग सुरू असलेल्या इमारतींच्या अग्निसुरक्षेबाबत आवश्यक उपाययोजना संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेकडून करण्यात येते.
नागपूर पोलीस आयुक्तालय अंतर्गत कोचिंग क्लास संचालकांची बैठक घेण्यात येते व भरोसा सेलमार्फत पोलीस काका, पोलीस दिदी, दामिनी पथक कोचिंग क्लासला भेट देवून महिला पोलीस विद्यार्थीनीसोबत चर्चा करून अडचणी जाणून घेतात.
(३) खाजगी शिकवणी वर्ग सुरू करण्यास मान्यता देणे किंवा त्यांची नोंदणी करणे याबाबत कायदे/नियम अस्तित्वात नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात लाचखोरीत शिक्षा झालेले शासकीय अधिकारी/कर्मचारी कामावर असल्याबाबत

**(२९) * ६२२ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.रामहरी रुपनवर, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.वजाहत मिर्झा, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात लाचखोरीत शिक्षा झालेले २२ व लाच घेताना पकडलेले १८५ शासकीय अधिकारी व कर्मचारी कामावर असल्याचे दिनांक ५ जुलै, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन लाचखोर अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

तथापि, सन २०१३ ते २०१९ पर्यंत राज्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत केलेल्या कारवाईनंतर दोषसिध्द झालेल्या लोकसेवकांपैकी १२ व निलंबित न केलेले १४१ लोकसेवक कामावर असल्याचे निदर्शनास आले आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत कारवाई केल्यानंतर संबंधित लोकसेवकास निलंबित करणे, बडतर्फ करणे याबाबी संबंधित प्रशासकीय विभागाच्या अखत्यारीत येत असल्याने वेळोवेळी त्यांना त्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

-----------------

## औरंगाबाद शहरात गुंगीच्या गोळयांना प्रतिबंध करण्याबाबत

**(३०) * २३३१ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद शहरातील ११ हजार तरुण नशेसाठी गुंगीच्या गोळयांचा सांकेतिक भाषेत बटन या नावाने सर्रासपणे वापर करीत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, औरंगाबाद शहरात नशेतील तरुण खून, खूनाच्या प्रयत्नासारखे गंभीर गुन्हे करीत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सहजपणे उपलब्ध होणाऱ्या गुंगीच्या गोळयांना प्रतिबंध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) सन २०२० मध्ये नशेसाठी गुंगीच्या गोळया विक्रीबाबत दप्तरी गुन्हा दाखल नाही. परंतु सन २०१९ मध्ये नशेसाठी गुंगीच्या गोळया विक्री/ताब्यात बाळगतांना मिळून आल्याबाबत पोलीस आयुक्त, औरंगाबाद कार्यक्षेत्रात १० गुन्हे दाखल असून १६ आरोपितांना अटक करुन त्यांच्या ताब्यातून रुपये ८९,७५६/- किंमतीचा माल जप्त करण्यात आला आहे.

(२) दिनांक २४/०९/२०१९ रोजी रात्रौ २३:५९ ते दिनांक २५/०९/२०१९ रोजी ००.३० वाजेच्या सुमारास तीन आरोपितांनी सय्यद जमीर सय्यद जहीर वय २५ वर्ष यास नशेच्या गोळया घेण्यासाठी पैशाची मागणी केली होती, पैसे न दिल्याचे कारणावरुन उक्त तीन आरोपितांनी त्यास चाकुने भोसकून जिवे ठार मारलेबाबत पो.स्टे. छावणी, औरंगाबाद शहर येथे गु.र.क्र. ३०६/२०१८ कलम ४, २५ भाहका सह कलम १३५ मपोका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. सदर प्रकरणी दिनांक २०/१२/२०१९ रोजी मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(३) गुंगीच्या गोळयांना प्रतिबंध करण्यासाठी गुप्त बातमीदारामार्फत माहिती काढून, तसेच पोलीस स्टेशनला तक्रारी प्राप्त झाल्यावर तात्काळ कार्यवाही करण्यात येते. अशा गुन्हयांना आळा घालण्यासाठी शाळा कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांशी संवाद साधून प्रबोधन करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुस्तकावर बंदी घालण्याबाबत

**(३१) * २७ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोपाळ (मध्यप्रदेश) येथे काँग्रेस सेवा दलाच्या कार्यक्रमाच्यावेळी काँग्रेस सेवा दलाने प्रकाशित केलेल्या पुस्तकातून स्वातंत्र्यवीर सावरकर यांची बदनामी करणारा व आक्षेपार्ह मजकूर असलेल्या पुस्तकावर बंदी घालावी व प्रकाशन करणाऱ्या सर्वसंबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी

सावरकर यांचे नातू श्री.रणजीत सावरकर यांनी तसेच अनेक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक ३ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास एका निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू मागणीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) व (२) होय, या विषयी स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे नातू श्री.रणजीत सावरकर यांचे मा.मुख्यमंत्री महोदयांना अग्रेषित केलेले दिनांक ०३/०१/२०२० रोजीचे पत्र प्राप्त झाले आहे व चौकशी चालू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## वसई (जि.ठाणे) येथील सागरी सुरक्षेच्यादृष्टीने उपाययोजना करण्याबाबत

**(३२) * ११०३ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गिरीज (ता.वसई, जि.ठाणे) येथील काही तरुण स्थानिक मच्छिमारांच्या दोन बोटी घेऊन समुद्रातील पोशापीर येथील खडकावर मासेमारीकरीता गेले असता परतीच्या प्रवासावेळी एक बोट लाटेच्या तडाख्याने उलटून त्यात एका तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बेकायदा भाड्याने बोट घेऊन मासेमारी आणि मौजमजेकरीता समुद्रात जाण्याचे प्रकार वाढू लागल्याने सागरी सुरक्षेला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सागरी सुरक्षेच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सागरी सुरक्षेच्या अनुषंगाने बोटीमधून सशस्त्र पोलीस दलासह दिवस व रात्रौ पाळीमध्ये सागरी गस्त करण्यात येते. तसेच संबंधित सागरी पोलीस ठाणे यांचेकडून दिवस व रात्रौ पाळीमध्ये समुद्रकिनारी गस्त करण्यात येते. सागरी सुरक्षेच्या अनुषंगाने जिल्हयातील सर्व सागरी व खाडी किनारी असलेले उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी/कर्मचारी यांना बिनतारी/ई-मेल संदेशाव्दारे तसेच मच्छिमार बांधव, मच्छिमार सोसायटी, सागर रक्षक दल, पोलीस मित्र, ग्रामस्थ, आजुबाजूच्या परिसरातील कोळी बांधव यांना बल्क एस.एम.एस.व्दारे सतर्कतेबाबत सुचित करण्यात येते. सागरी व खाडी किनारी भागात गस्त करण्यात येते. समुद्रातील संशयास्पद वस्तू, इसम यांच्या हालचाली आढळून आल्यास तात्काळ मच्छिमार सोसायटी, संबंधित पोलीस ठाणे, नियंत्रण कक्ष, पालघर, कोस्टगार्ड, तसेच पालघर जिल्हयातील सागरी गस्तीस असलेल्या अधिकारी, कर्मचारी यांच्याशी समन्वय साधण्यात येतो.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्हयातील घरफोडीच्या घटनांना आळा घालण्याबाबत

**(३३) * १८१६ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयात माहे जानेवारी, २०१९ ते जुलै, २०१९ या सात महिन्यात १०१ घरफोडींचे गुन्हे दाखल झालेले असून बिरवाडी (ता.महाड, जि.रायगड) येथे चोरट्यांनी दिनांक ९ ऑगस्ट, २०१९ रोजी वा त्यासुमारास मध्यरात्री एकाच वेळी ९ घरफोडी व २ दुकाने फोडून रुपये ९ लाखांचा ऐवज चोरी झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १०१ घरफोडींचे गुन्ह्यांपैकी केवळ ३० गुन्ह्यातील आरोपींना पकडण्यात पोलिसांना यश मिळाले असून उर्वरित गुन्ह्यांवरील तपास प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रायगड जिल्हयातील घरफोड्यांचे प्रकार रोखण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) व (२) १०१ गुन्हयांपैकी ४८ गुन्हयांची निर्गती करण्यात आली असून ५३ गुन्हे तपासावर आहेत. त्यामध्ये ४२ आरोपींना पकडण्यात आले आहे. एकूण ३१,५६,४९५ रुपयांचा गुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.

दिनांक ०९/०८/२०१९ रोजी चोरी झालेली नसून दिनांक १५/०८/२०१९ रोजी महाड बिरवाडी येथील घरे व दुकाने फोडून रुपये २,६५,५६०/- किंमतीचा ऐवज चोरी झालेला आहे.

सदर बाबत महाड एमआयडीसी पोलीस ठाणे येथे मु.र.नं. ५४/२०१९, भादंवि कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे दिनांक १६/०८/२०१९ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) घरफोडीच्या घटनांना आळा घालण्यासाठी रात्रीच्यावेळी जास्तीत जास्त नाकाबंदी करुन नाईड राऊंड नेमणूक केली जाते. रायगड जिल्हयात पोलीस ठाण्यात नेमलेले बिटमार्शल कर्मचारी २४ तास शहराच्या हद्दीत गस्तीकरीता नेमलेले आहेत. रेकॉर्डवरील आरोपी, हिस्ट्रीशीटर तसेच अनोळखी व्यक्तींना पोलीस ठाण्यातील कर्मचाऱ्यांकडून नियमित चेक केले जाते. जेलमधून सुटणाऱ्या आरोपींवर प्रतिबंधक कारवाई करण्यात येते. शहरामधील सोसायट्यांना सुरक्षा रक्षक नेमणेबाबत व सी.सी.टि.व्ही. कॅमेरे लावण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोंदिया जिल्हयामधील पशु तस्करी रोखण्याबाबत

**(३४) * २१३९ डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यामधून शेळी-मेंढी या पशुंना मोठ्या वाहनामध्ये कोंबून हैदराबादमध्ये तस्करी होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोंदिया-तिरोडा मार्गावरून तस्करीसाठी निघालेल्या पशुंनी भरलेला ट्रक क्रमांक एमएच-४०/बीजी-७६७७ या वाहनाला स्थानिक पोलिसांनी ताब्यात घेतले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गोंदिया जिल्ह्यामधील पशु तस्करांवर कारवाई करुन पशु तस्करी रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) होय.

(२) होय.

(३) पोलीस स्टेशन, गंगाझरी येथे चार आरोपींविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. ३०७ शेळ्या व एक ट्रक असा एकूण रुपये २९,१५,०००/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गोंदिया जिल्ह्यात पशु तस्करी रोखण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखा व पोलीस स्टेशन यांच्याकडून मोहिम व रात्र गस्त राबवून पशु तस्करी करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येत आहे. चालू वर्षात गाय, बैल, म्हशी व हेले या पशूंच्या तस्करी प्रकरणी नऊ गुन्ह्यांमध्ये एकूण २८ आरोपींविरुध्द कारवाई करुन रुपये १,२९,७१,०००/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जव्हार व मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील आदिवासी कुटुंबांना रोजगार हमी योजनेंतर्गत कामे देण्याबाबत

**(३५) * २३२५ श्री.आनंद ठाकूर, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील आदिवासी कुटुंबाचे रोजगारासाठी स्थलांतर होत असल्याने स्थानिक गाव पातळीवर पुरेशी रोजगार हमी योजनेची कामे प्रशासनाने सुरु करण्यासाठी व मृत्यू पावलेल्या आदिवासी शेतमजूरांच्या वारसांना नुकसान भरपाई देण्यासाठी ‘समर्थन’ संस्थेने दिनांक १६ नोव्हेंबर, २०१९ रोजी अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, सचिव, रोजगार हमी योजना विभाग, आयुक्त, रोजगार हमी योजना विभाग यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धामणशेत, नाशेरा, आसे, बोटाशी, खोच, सायदे (ता.मोखाडा, जि.पालघर) या ६ ग्रामपंचायतींतर्गत मनरेगा जॉबकार्डधारक आदिवासी मजूरांनी पत्रक नमुना क्र. ४ भरुन मोखाडा पंचायत समितीकडे कामाची मागणी करुनही रोजगार न मिळाल्याने बेकार भत्ता (बुडीत मजूरी) उपलब्ध करून देण्याची मागणी मजूरांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मनरेगा योजनेची अंमलबजावणी करुन आदिवासी मजूरांना रोजगार हमी योजनेची कामे मिळण्याबाबत दिनांक १५ ऑक्टोबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास ‘समर्थन’ संस्थेने सचिव, रोजगार हमी योजना, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, सचिव, ग्रामविकास विभाग, तहसिलदार, मोखाडा यांच्याकडे पत्राव्दारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आदिवासींच्या विकासासाठी गावठाणात व गावपाड्यांमध्ये रोजगार आणि मुलभूत अधिकार व सुविधांची कामे सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) जव्हार व मोखाडा तालुक्यात ग्रामपंचायत व इतर यंत्रणांमार्फत मनरेगा अंतर्गत संबंधित जॉबकार्डधारक आदिवासी कुटुंबांना मागणीनुसार सन २०१९-२०२० मध्ये वैविध्य पूर्ण अनुज्ञेय वैयक्तिक व सार्वजनिक मत्ताकारक कामे शेल्फवर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात क्रीडा संकुलांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३६) * १६०४ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे, रत्नागिरी, नाशिक, औरंगाबाद आणि अमरावती येथे क्रीडा संकुलांची देखभाल होत नसल्याने क्रीडा संकुल विनावापर पडून आहे तसेच राज्यातील होतकरुन खेळांडूना आंतरराष्ट्रीयस्तरावर नेण्यासाठी क्रीडापटू तयार करण्यासाठी केंद्र शासनाकडून आलेला निधी विनावापर पडून आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्येक तालुक्यात एक क्रीडा संकुल असावे असे शासनाचे धोरण असताना रायगड जिल्ह्यात चार तालुक्यामध्ये शासनाला क्रीडा संकुलासाठी जागा मिळालेली नसून रायगड जिल्ह्यात यापुर्वी बांधण्यात आलेल्या ११ क्रीडा संकुलांच्या देखभाल, दुरुस्तीकरीता रुपये १ कोटींची आवश्यकता असताना शासनाने केवळ रुपये १५ लाख ८४ हजार निधी मंजूर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रायगड जिल्ह्यातील ११ क्रीडा संकुलांपैकी ६ क्रीडा संकुलांची नियमित दुरूस्ती, धावपट्टी निगा, इनडोअर स्टेडियमची दुरूस्ती व कामगारांचा पगार यासाठी हा मंजूर झालेला निधी वापरला जाणार असल्याने रायगड जिल्ह्यातील क्रीडा संकुलांची स्थिती खूप बिकट आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने क्रीडा संकुलाच्या देखभाल, दुरुस्ती व सुसज्ज ठेवण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार :** (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

रायगड जिल्ह्यातील ४ तालुका क्रीडा संकुलासाठी जागा उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच, क्रीडा धोरणांतर्गत तालुका क्रीडा संकुलाच्या देखभाल दुरुस्तीकरीता प्रतिवर्षी रुपये ३.०० लक्ष च्या मर्यादेत निधी देण्यात येत असून, रायगड जिल्ह्यातील ६ तालुका क्रीडा संकुलाच्या देखभाल दुरुस्तीसाठी सन २०१९-२०२० मध्ये रुपये १५.८४४ लक्ष इतका निधी वितरीत केला आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तळा (जि.रायगड) पोलीस ठाण्याकरीता स्वतंत्र प्रशासकीय इमारत उभारण्याबाबत

**(३७) * १८६६ श्री.प्रविण दरेकर, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळा (जि.रायगड) पोलीस ठाण्याला स्वत:च्या हक्काची प्रशासकीय इमारत नसल्यामुळे पोलीस स्टेशन अंतर्गत कार्यरत असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना तसेच पोलीस स्टेशनवर येणाऱ्या ग्रामस्थांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तळा तालुक्याची निर्मिती झाल्यानंतर स्वतंत्र पोलीस ठाण्याची गरज भासू लागल्यामुळे तळावासियांनी पोलीस ठाण्याची मागणी केल्यानंतर, हे पोलीस ठाणे कोषागार कार्यालयाच्या एका खोलीत सुरु करण्यात आले, कोषागार कार्यालय कर्मचारी वर्गात वाढ झाल्याने पुन्हा पोलीस ठाणे तेथून स्थलांतरीत करुन तळ्याच्या चंडिका माता मंदिरा शेजारील भाड्याच्या खोल्यांमध्ये सुरू करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तळा पोलीस ठाण्याला स्वतंत्र प्रशासकीय इमारत उभारण्याची मागणी मा.मुख्यमंत्री, पोलीस महासंचालक, पोलीस अधीक्षक, रायगड आदींकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तळा पोलीस ठाण्याकरीता स्वतंत्र इमारत उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१), (२) व (३) शासन निर्णय, गृह विभाग, दिनांक ०७/०८/२००७ व्दारे पोलीस अधीक्षक, रायगड यांच्या आस्थापनेवर पोलीस ठाणे, माणगांव याचे विभाजन करुन पोलीस ठाणे, तळा निर्माण करण्यात आले. पोलीस ठाणे, तळा हे दिनांक ०९/०८/२००९ पासून कार्यशील झाले.

उक्त पोलीस ठाण्याचे कामकाज तात्पुरते तळा येथील उपकोषागार कार्यालयात सुरु करण्यात आले होते. तथापि, उपकोषागार कार्यालयास त्या जागेची आवश्यकता असल्याने ती रिक्त करण्याबाबत पोलीस विभागास कळविण्यात आले होते. म्हणून पोलीस ठाणे, तळा यांच्याकरीता तळा येथे एक खाजगी इमारत भाड्याने घेण्यात आली आणि दिनांक ०१/०३/२०१७ पासून उक्त पोलीस ठाणे त्या इमारतीत कार्यरत आहे.

उक्त इमारतीत पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना आवश्यक त्या सर्व सुविधा पुरविण्यात आल्या आहेत आणि त्यांची गैरसोय होत नाही. तसेच, उक्त पोलीस ठाण्यात येणाऱ्या अभ्यागतांचीही गैरसोय होत नाही.

(४) पोलीस ठाणे, तळा यांच्याकरीता नवीन प्रशासकीय इमारत व सेवा निवासस्थाने यांचे बांधकाम करण्यासाठी पोलीस अधीक्षक, रायगड यांनी जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडे शासकीय जमिनीची मागणी केली आहे. जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडून जमीन उपलब्ध झाल्यावर उक्त पोलीस ठाण्याकरीता नवीन प्रशासकीय इमारत व सेवा निवासस्थाने यांचे बांधकाम करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस महासंचालक, म.रा., यांच्याकडून म.रा. पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या. यांना सादर करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे येथील ग्रॅबीयल को.ऑप.हौ. सोसायटीने बेकायदेशीररित्या नळ जोडणी तोडल्याबाबत

**(३८) * १९८५ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील सेक्टर ४ मधील ग्रॅबीयल को.ऑ.हौ. सोसायटी येथे बेकायदेशीररित्या नळ जोडणी तोडल्याप्रकरणी सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांना नोटीस देण्यात आली होती, उक्त सदनिकाधारकांनी या संदर्भात दोन वेळा वागळे इस्टेट पोलीस स्टेशन व श्रीनगर पोलीस स्टेशनमध्ये लेखी तक्रार दाखल केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेकायदेशीररित्या नळ कनेक्शन तोडताना त्यांचे फोटो काढण्यात आले होते व त्यांना रंगेहात पकडून पोलीस स्टेशनला पुराव्यासहीत तक्रार दाखल केले होते, परंतू, दोन्ही पोलीस स्टेशनचे पोलीस पदाधिकारी यांनी सोसायटीच्या पदाधिकाऱ्यासोबत आर्थिक संगनमत करुन प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केला, तसेच आरोपींकडून आर्थिक संगनमत करुन आरोपींना तात्काळ सोडले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदनिकाधारकांनी याबाबतीत आपल्या तक्रारीची दखल घेतली जात नसल्याने हे प्रकरण गुन्हे शाखेकडे देण्यात यावे अशी मागणी लेखी पत्राव्दारे मा.गृह मंत्री व पोलीस आयुक्त यांच्याकडे केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदनिकाधारकांनी केलेल्या तक्रारीकडे दुर्लक्ष करुन आरोपींशी संगनमत करुन आरोपीवर कारवाई न करणाऱ्या संबंधित पोलीस अधिकाऱ्यांवर तसेच सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांवर फौजदारी स्वरुपाची कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

अर्जदार यांच्या तक्रारीप्रमाणे श्रीनगर पोलीस ठाणे पोलिसांनी सोसायटीचे पदाधिकारी यांचेसोबत आर्थिक संगनमत करुन अर्जदार यांची तक्रार दडपण्याचा प्रयत्न केला असे आढळून आलेले नाही.

(३) अर्जदार यांनी आपल्या तक्रारीच्या प्रती विविध शासकीय कार्यालये व तत्कालीन मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना पाठविलेली असून अर्जदार यांनी अर्जात केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने त्यांचे तक्रार अर्जाचा तपास श्रीनगर पोलीस ठाणे ऐवजी वागळे इस्टेट पोलीस ठाणेकडून नि:पक्षपातीपणे करण्यात आलेला आहे.

(४) अर्जदार यांच्या अर्जातील नमूद तक्रारीप्रमाणे सदनिकेचा मुख्य पाणीपुरवठा सोसायटी पदाधिकारी यांनी तोडलेला नसल्याचे दिसून आलेला आहे. तसेच सोसायटीने स्वखर्चाने सोसायटी आवारात बोरींग करुन सभासदांना अतिरिक्त पाणीपुरवठा सुविधा पुरविलेली होती. परंतु, अर्जदार यांनी मासिक देखभाल खर्च दिलेला नसल्यामुळे सदरचा अतिरिक्त पाणीपुरवठा सोसायटीने खंडित केला होता. नंतर तो पूर्ववत करण्यात आलेला आहे. अर्जदार व सोसायटी पदाधिकारी यांच्यामध्ये अर्जदार यांची सदनिका अर्जदार यांचे नावे करण्यावरुन व मासिक देखभाल खर्चावरुन तक्रारी उपनिबंधक सहकारी संस्था, ठाणे या कार्यालयाकडे प्रलंबित असल्याचे आढळून आले आहे. सोसायटीचे पदाधिकारी यांनी कोणताही पोलीस दखलपात्र स्वरुपाचा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले नाही म्हणून सदर अर्ज दप्तरी दाखल करण्यात येत असलेबाबत अर्जदार यांना समज देण्यात आलेली आहे. तसेच, स्थानिक पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी यांनी सोसायटी पदाधिकारी यांचेशी संगनमत करुन कर्तव्यात कसुरी केल्याचे दिसून आलेले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धामणगाव रेल्वे (जि.अमरावती) तालुक्यातील पोलीस कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थान बांधण्याबाबत

**(३९) * २५८८ श्री.अरुणभाऊ अडसड :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धामणगाव विधानसभा मतदारसंघ अंतर्गत धामणगाव रेल्वे चांदुर रेल्वे मंगरुळ दस्तगीर, तळेगाव दशासर, नांदगाव खंडेश्वर, मंगरुळ चव्हाळा व लोणी पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीस कर्मचाऱ्यांना घरे बांधण्याबाबत निवेदन देऊनही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१), (२) हे खरे नाही.

पोलीस अधीक्षक, अमरावती (ग्रामीण) यांच्या आस्थापनेवरील,-

i. पोलीस ठाणे, मंगरुळ दस्तगीर येथे २३ पोलीस सेवा निवासस्थाने यांचे बांधकाम सा.बां. विभागाकडून सुरु असून ते ३० टक्के पूर्ण झाले आहे.
ii. पोलीस ठाणे, तळेगाव दशासर येथे २८ पोलीस सेवा निवासस्थाने यांचे बांधकाम सा.बां. विभागाकडून सुरु असून ते २५ टक्के पूर्ण झाले आहे.

उक्त दोन्ही कामांसाठी आवश्यक तो पूर्ण निधी सा.बां. विभागास देण्यात आला आहे.

(i) पोलीस ठाणे, चांदूर रेल्वे, (ii) पोलीस ठाणे, नांदगाव खंडेश्वर, (iii) पोलीस ठाणे, लोणी व (iv) पोलीस ठाणे, मंगरुळ चव्हाळा येथे प्रशासकीय इमारत/सेवा निवासस्थाने यांचे बांधकाम प्रस्ताव पोलीस महासंचालक, म.रा., यांनी म.रा. पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या. यांना सादर केले आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार ही कामे करण्याचे प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात रस्ते अपघात रोखण्याकरीता उपाययोजना करण्याबाबत

**(४०) * ६२७ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे जानेवारी ते सप्टेंबर, २०१९ या नऊ महिन्यात रस्त्यांवर वाढलेल्या खड्ड्यामुळे, वाहनांचा वाढलेला वेग, मद्यपान करुन निष्काळजीपणे वाहन चालविणे, विनाहेल्मेट वाहन चालविणे, वाहतुकीच्या नियमांचे उल्लघंन केल्याने इ. कारणामुळे २५ हजार १३० अपघातांमध्ये १० हजार २३ जणांचा रस्ते अपघातात मृत्यू झाल्याची माहिती माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपघात रोखण्यासाठी प्रत्येक जिल्हास्तरावर रस्ता सुरक्षा समिती कार्यरत असतानाही अपघात कमी झाले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अपघातात विनाहेल्मेट दुचाकीस्वारांचे प्रमाण अधिक आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील वाढते अपघात रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) सन जानेवारी ते सप्टेंबर, २०१९ या कालावधीत राज्यातील रस्त्यावरील विविध कारणांनी झालेल्या २४२६२ अपघातात एकूण ७,३१० व्यक्तींचा मृत्यू झाला आहे.

(२) हे खरे नाही.

राज्यात सन २०१८ च्या तुलनेत सन २०१९ मध्ये अपघातात १० टक्के घट झाली आहे.

(३) हे खरे नाही.

अपघातात मृत्यूमुखी पडणाऱ्यांमध्ये वेग मर्यादेचे उल्लंघन करून वाहन चालविणाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे.

(४) १) मुंबई शहरामध्ये रस्ते क्रॅश ॲनॅलिसीस सेंटर सुरू करण्यात आले आहे. तेथे अपघाताचे ॲनॅलिसीस करून भविष्यातील अपघात रोखण्याकरीता संबंधित ठिकाणी उपाययोजना करण्यात येतात.

२) वेग मर्यादेचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांविरुध्द कायदेशिर कारवाई करण्याकरीता महत्त्वाच्या ठिकाणी Speed Detector कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत.

३) वाहतूक पोलिसांच्या शिक्षण विभागामार्फत शालेय विद्यार्थ्यांना रोड सेफ्टी विषयक प्रशिक्षण देण्यात येते.

४) अत्याधुनिक ब्रेथ ॲनालायझर मशीन्सच्या मदतीने ड्रंक ॲण्ड ड्राईव्ह मोहिमेंतर्गत मद्यप्राशन करून वाहन चालविणाऱ्या चालकांविरूध्द कारवाई करण्यात येते.

५) वर्षाच्या सुरूवातीला जानेवारी महिन्यात वाहतूक सुरक्षा पंधरवडाचे आयोजन करून त्याव्दारे वाहनचालक, रिक्षा टॅक्सी चालक यांच्याकरीता सभा तसेच बॅनर्स, फलकाव्दारे वाहतुकीचे नियम पाळण्याबाबत प्रबोधन करण्यात येते.

६) मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर वाहतूक कोंडी कमी करण्याकरीता सुट्टीच्या दिवसात गोल्डन अवर्स ही संकल्पना राबविण्यात येते.

७) घाट सेक्शनमध्ये वाहतूक कोंडी कमी करण्याकरीता वाहतुकीची कोंडी व अपघात होत असलेल्या ठिकाणी पोलीस कर्मचारी नेमण्यात येतात.

८) शहरातील नागरीकांना वाहतूक व अपघाताची माहिती मिळण्याकरीता हेल्पलाईन नंबर व एम.टी.पी.ॲप सुरू करण्यात आले आहे.

९) पादचारी रस्ता पार करताना घडणारे अपघात टाळण्याकरीता स्कायवॉकचा वापर करण्याबाबत त्यांना सूचना देऊन उद्युक्त करण्यात येते.

१०) अपघात प्रवण क्षेत्रामध्ये (Black Spot) दुरूस्ती करणेबाबत बैठक घेऊन सार्वजनिक बांधकाम विभाग व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांना अपघात आणि वाहतूक कोंडी कमी करण्याबाबत सूचित केले आहे.

११) तसेच अपघातातील जखमी झालेल्या व्यक्तींना तात्काळ वैद्यकिय मदत उपलब्ध करण्याच्यादृष्टीने महामार्गावर ट्रामा केअर सेंटर उभारण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## फुलंब्री (जि.औरंगाबाद) तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीक विम्याची मदत देण्याबाबत

**(४१) * २४७८ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फुलंब्री (जि.औरंगाबाद) तालुक्यात माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे ९२ गावातील ४९ हजार हेक्टर क्षेत्रावरील खरीप पिकांचे नुकसान झाले असून तीन महिन्यांचा कालावधी होऊनही बाधित क्षेत्रातील शेतकऱ्यांना पीक विम्याचे पैसे मिळाले नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बाधित शेतकऱ्यांना पीक विम्याची मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे अंशत: खरे आहे.

फुलंब्री तालुक्यामधील पीक विमा योजनेमध्ये सहभागी शेतकऱ्यांपैकी ४६०८६ शेतकऱ्यांचे एकूण २३०१२ हे. क्षेत्राचे पंचनामे करुन अहवाल संबंधित कंपनीस पाठविण्यात आला असून विमा कंपनीकडून नुकसानीची परिगणना करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) याबाबत केंद्र व राज्यस्तरावर नुकसान भरपाई निश्चित करणेबाबत वेळोवेळी आढावा घेण्यात आला आहे. त्यानुसार संबंधित विमा कंपन्यांना केंद्र शासनाने दिनांक ११/०२/२०२० च्या पत्रान्वये अवेळी/चक्रीवादळामुळे झालेल्या नुकसान भरपाईची अदायगी करणेबाबत निर्देश दिले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील पोलिसांच्या वास्तव्यासाठी विशेष गृहनिर्माण धोरण राबविण्याबाबत

**(४२) * १११८ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.सदाशिव खोत, श्री.रविंद्र फाटक, श्री.महादेव जानकर, श्री.निलय नाईक, श्री.नागोराव गाणार, डॉ.रणजित पाटील, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती स्मिता वाघ, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रामदास आंबटकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोलिसांच्या वास्तव्यासाठी घरे उपलब्ध व्हावीत यासाठी विशेष गृहनिर्माण धोरण तयार करण्याची घोषणा मा.नगरविकास मंत्री व मा.गृह मंत्री यांनी दिनांक ३० डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धोरण निश्चित करण्यासाठी राज्याचे पोलीस महासंचालक यांच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती स्थापन करण्याचे निर्देश मा.गृह मंत्री यांनी दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू धोरणाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पोलिसांच्या वास्तव्यासाठी विशेष गृहनिर्माण धोरण तयार करुन अंमलात आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१), (२), (३) व (४) राज्यातील पोलीस ठाणी व पोलीस वसाहती यामधील सुविधाबाबत मा.गृह मंत्री, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३०/१२/२०१९ रोजी एक बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत मा.गृह मंत्री यांनी पोलीस महासंचालक, म.रा., आणि पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांना पुढीलप्रमाणे निदेश दिले :-

I. सध्याच्या पोलीस सेवा निवासस्थानांच्या आढावा घ्यावा आणि आणखी किती सेवा निवासस्थानांची गरज आहे ते ठरवावे.

II. दुरुस्तीच्या पलिकडे असलेल्या सेवा निवासस्थानाचा पुनर्विकास व नवीन सेवा निवासस्थानाचे बांधकाम ही कामे सिडको व म्हाडा यासारख्या शासकीय संस्था आणि खाजगी विकासक यांच्यामार्फत अथवा त्यांच्याशी भागीदारीने करण्याबाबत धोरण ठरवण्यासाठी सुसाध्यता अभ्यास करुन शासनास अहवाल सादर करावा.

वरील निदेशानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मालवण (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील मिळकतीवर बाधितांची वारस नोंद घेण्याबाबत

**(४३) * २३४९ डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण (जि.सिंधुदुर्ग) येथील भूमापन क्र. व उपविभाग क्र. १९२४ भोगवटादार वर्ग २ येथील मिळकतीवर बाधित वारसदारांनी आवश्यक त्या कागदपत्रासह माहिती देऊनही वारस नोंद घेण्याबाबत तलाठी कार्यालय मालवण, जि.सिंधुदुर्ग यांचेकडे दिनांक ३० एप्रिल, २०१५ व दिनांक १४ जून, २०१६ रोजी अर्जाव्दारे मागणी करुनही बाधितांची नावे वारस नोंद केली नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत तहसिलदार, मालवण व तलाठी, मालवण यांचेकडे वारंवार पाठपुरावा करुनही ते वारस नोंद घेण्याच्या कामाकडे दुर्लक्ष करुन कामात टाळाटाळ करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बाधितांनी मा.मुख्यमंत्री, मा.महसूल मंत्री, जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांचेकडे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान लेखी पत्राद्वारे संबंधितांविरुध्द तक्रार अर्ज केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वारस नोंद घेण्याच्या कामाकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करुन बाधितांना न्याय देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) होय.

तथापि, सदरचा भूमापन क्रमांक १९२४ मौजे मालवण गावाशी संबंधित नसून सजा कुणकावळे अंतर्गत मौजे साळेल या गावातील आहे.

(२), (३), (४) व (५) तलाठी सजा कुणकावळे यांनी मौजे साळेल येथील गट नं.१९२४ साठी दिनांक २६/०८/२०१९ रोजी वारस नोंद केलेली आहे. अर्जदाराने दिनांक २१/०१/२०२० रोजी जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग कार्यालयात दाखल केलेला अर्ज शासनाचे प्रचलित कायदे व नियमाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाहीस्तव तहसिलदार, मालवण यांना दिनांक २३/०१/२०२० रोजी पाठविण्यात आलेला आहे.

-----------------

## मुंबई व नवी मुंबईत येथे माथाडी कामगारांसाठी घरे बांधण्याबाबत

**(४४) * १६८८ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील वडाळा ट्रक टर्मिनल येथे माथाडी कामगार म्हणून कार्यरत असलेल्या कामगारांना हक्काची घरे मिळण्यासाठी सन २००६ मध्ये शासनाने वडाळा साल्ट पॅन येथील भूखंड क्र. ६ व ९ ही जमीन माथाडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्थेला दिली असून सदर संस्थेत नोंदणी झालेल्या सुमारे ४५०० कामगारांपैकी ७० टक्के सभासद हे माथाडी कामगार नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच नवी मुंबई येथील माथाडी कामगारांसाठी बांधण्यात आलेल्या गृहसंकुल वाटपात देखील अनियमितता असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहु माथाडी कामगारांच्या घर योजनेत मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याबाबत सामाजिक कार्यकर्ते श्री.संतोष चव्हाण यांनी लेखी निवेदनाव्दारे मा.मुख्यमंत्री, मा.महसूल मंत्री, मा.सहकार मंत्री व जिल्हाधिकारी, मुंबई शहरे आदीकडे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने माथाडी कामगारांना हक्काची घरे देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) व (२) मौजे आणिक वडाळा येथील भूकर क्र.६ (पै) व ९ (पै) मधील सुमारे ६.५ हेक्टर शासकीय जमीन माथाडी कामगारांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस निवासी प्रयोजनासाठी भाडेपट्टयाने प्रदान केली आहे. सदर मिळकतीच्याबाबतीत जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी मिळकत प्रदान आदेशाच्या दिनांकास अस्तित्वात असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना जमीन प्रदान करण्यासंदर्भातील शासनाचे धोरण विचारात घेऊन, सदर संस्थेच्या सभासदांची पात्रता तपासून पात्र सभासदांचे सदस्यत्व कायम करावे व अपात्र सदस्यांना लाभ दिला जाणार नाही याची दक्षता घ्यावी असे निर्देश तत्कालीन मा.मंत्री (महसूल) यांनी दिनांक २०/०२/२०१९ रोजी दिलेले आहेत. त्यानुसार सदस्यांची पात्रता तपासणी करण्याचे कामकाज जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्या कार्यालयाकडून सुरु आहे.

ठाणे तालुक्यातील नवी मुंबई हद्दीत माथाडी कामगारांच्या गृहसंकुलाकरीता महसूल विभागामार्फत तसेच जिल्हाधिकारी, ठाणे कार्यालयामार्फत कोणताही भूखंड/जागा वाटप करण्यात आलेला नाही.
(३), (४) व (५) वडाळा येथील भूकर क्र. ६ व ९ वरील माथाडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्थेस प्रदान केलेल्या शासकीय जमिनीवर उभारण्यात येणाऱ्या गृहनिर्माण संस्थेने शासनाच्या अटी व शर्तीचे उल्लंघन करुन कोट्यवधीचा गैरव्यवहार झाल्याबाबतची चौकशी करण्यात यावी अशा

आशयाची तक्रार श्री.संतोष चव्हाण यांनी दिनांक ३०/०९/२०१९ रोजीच्या पत्रान्वये केली आहे. या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी तक्रारदार व संस्थेच्या सभासद यांची दिनांक १०/१२/२०१९ व दिनांक ०७/०१/२०२० रोजी सुनावणी घेतली आहे. त्यावेळी जाबदार संस्था व तक्रारदार यांचेकडून लेखी म्हणणे सादर केले आहे.

त्यानुषंगाने व मा.मंत्री (महसूल) यांच्या दिनांक २०/०२/२०१९ रोजीच्या आदेशानुसार सभासदांची पात्रता तापसणीचे काम सुरु असून ते पूर्ण झाल्यावर पात्र सभासदांची यादी जिल्हाधिकारी, मुंबई शहर शासनास सादर करणार आहेत.

-----------------

## देवगड (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील पोलीस कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थान उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४५) * २२३२ श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवगड (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यात १ निरीक्षक, ३ उप पोलीस निरीक्षकसह ७५ पोलीस कर्मचारी कार्यरत असून मौजे जामसंडे (ता.देवगड) सर्वे क्र. ४१८-ब/१ या ३५ गुंठे भूखंडावर ९ व १० खोल्या असलेल्या २ चाळीमध्ये सदर पोलीस कर्मचाऱ्यांसाठी शासकीय निवासस्थाने देण्यात आली होती, सदरहू चाळी कमकुवत व धोकादायक झाल्याने ५ वर्षापूर्वी ती शासकीय निवासस्थाने खाली करण्यात आली असून देवगड तालुक्यातील पोलीस कर्मचाऱ्यांना शासकीय निवासस्थान उपलब्ध करुन देण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन देवगड तालुक्यातील पोलीस कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थान उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) व (२) देवगड तालुक्यातील पोलिसांसाठी मौजे जामसंडे (ता.देवगड) सर्वे क्र. ४१८-ब/१ या भूखंडावरील शासकीय निवासस्थाने जुनी, जीर्ण व धोकादायक झाल्याने ती खाली करण्यात आली हे खरे आहे.

तथापि, पोलीस निरीक्षक, देवगड पोलीस ठाणे यांना शासकीय निवासस्थान वाटप करण्यात आलेले आहे. तसेच देवगड, मालवण, आचरा, वैभववाडी, कणकवली या पोलीस ठाणे अंतर्गत पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचेकरीता शासकीय निवासस्थानाचे बांधकाम कणकवली या ठिकाणी करण्यासाठी पोलीस महासंचालक, म.रा. यांचेमार्फत महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या., मुंबई यांना प्रस्ताव पाठविण्यात आला असून तो कार्यवाहीधीन आहे. याबाबत निधी उपलब्धतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धारुर (जि.बीड) येथे पशुवैद्यकीय दवाखाना इमारत बांधकामासाठी निधी मिळण्याबाबत

**(४६) * २०२२ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धारुर (जि.बीड) येथे पशुवैद्यकीय दवाखाना इमारत बांधकामासाठी शासनाने निधी मंजूर केला असून या इमारतीसाठी माहे मार्च, २०१८ मध्ये जिल्हा नियोजन विभागामधून रुपये २५ लाखांचा निधी मंजूर करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील बांधकाम हे माहे मार्च, २०१९ पर्यंत करणे बंधनकारक असतानाही ठेकेदाराने इमारत न बांधल्याने मंजूर झालेला निधी शासनास परत गेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पशुवैद्यकीय दवाखाना इमारतीचे बांधकाम पूर्ण न झाल्याने पशुपालकाची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पशुवैद्यकीय दवाखान्याची इमारतीकरीता निधी उपलब्ध करुन इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार :** (१) माहे मार्च, २०१८ मध्ये धारुर (जि.बीड) येथे पशुवैद्यकीय दवाखाना इमारत बांधकामासाठी जिल्हा नियोजन समितीकडून रुपये २४.९९ लाखांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

(२) मार्च, २०१९ पर्यंत निविदा कार्यवाही पूर्ण होऊन बांधकाम सुरू होऊ न शकल्याने सदर बांधकामाचा निधी अखर्चित राहिला आहे. उक्त निधी खर्च करण्याची मुदत संपल्यामुळे सदर निधी शासनास प्रत्यार्पित करण्याची कार्यवाही जिल्हा परिषद, बीड यांच्यास्तरावर सुरू आहे.

(३) सध्या पशुवैद्यकीय दवाखाना धारुर येथील जुन्या इमारतीमधून पशुपालकांना पशुवैद्यकीय सेवा पुरविण्यात येत आहे.

(४) धारूर येथील पशुवैद्यकीय इमारत बांधकामासाठी सन २०२०-२०२१ जिल्हा वार्षिक योजनेमध्ये आवश्यक निधी उपलब्ध करून घेण्याची कार्यवाही जिल्हा परिषद, बीड यांच्यास्तरावर सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेंद्र भागवत**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.